MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष सव्वीसावे/अंक १/जानेवारी २०२५

## संपादकीय

### स्मरण : एका मराठमोळ्या गणितज्ज्ञाचे

मागच्या शतकात एक महान गणितज्ज्ञ महाराष्ट्रात होऊन गेले. त्यांचे नाव दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर असे आहे. त्यांचा जन्म १७ जानेवारी १९०५ ला पालघर जिल्ह्यातील डहाणू या गावी झाला. त्यांनी आपले शिक्षण ठाणे आणि पुणे येथून पूर्ण केले. त्यानंतर ते नाशिकजवळच्या देवळाली येथील शासकीय शाळेत शिक्षक म्हणून नोकरीला लागले. गणितासारखा रुक्ष विषय मनोरंजक करून शिकविण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यामुळे ते विद्यार्थ्यांत फारच लोकप्रिय होते. १९६२ मध्ये ते निवृत्त झाले. त्यानंतर देखील स्वतः सायकल चालवत जाऊन आजूबाजूच्या अनेक खेड्यांतील मुलांना त्यांनी गणितातील गंमतीजमती शिकविल्या.

कापरेकरांना आकड्यांशी खेळण्याची सवय बालपणापासूनच होती. त्यांना त्यांच्या महाविद्यालयीन काळात गणितातील रँग्लर परांजपे पारितोषिक मिळाले होते. कापरेकर यांचा गणितातील आकड्यांशी खेळ नोकरीच्या काळात आणि निवृत्तीनंतरही चालूच होता. त्यांना गणिताचा छंद होता असेच म्हणावे लागेल. ६१७४ हा अंक 'कापरेकर स्थिरांक' म्हणून प्रसिद्ध आहे. ६१७४ या चार अंकी संख्येतील आकड्यांची उलटापालट केल्यास, चोवीस चार अंकी संख्या मिळतात. त्यातील कोणत्याही एका संख्येतील अंक चढत्या व उतरत्या क्रमाने मांडले आणि मोठ्या संख्येतून लहान संख्या वजा केली तर उत्तर ६१७४ असेच येते हे कापरेकर यांनी दाखवून दिले. उदाहरणार्थ, ७६४१ ही संख्या उलट्या क्रमाने लिहिल्यास १४६७ अशी येईल आणि ७६४१ व १४६७ यांची वजाबाकी ६१७४ अशी येते.

त्यांनी त्यांच्या स्वतःच्या 'दत्तात्रय' नावाच्या संख्येचाही शोध लावला. दत्तात्रयात ब्रह्मा, विष्णू, महेश अशा तीन देवता आहेत; तसेच, तीन वर्गदर्शन देणाऱ्या संख्याही गणितात आहेत हे कापरेकर यांनी शोधून काढले. उदाहरणार्थ, ४९ या संख्येत २ चा वर्ग ४ आणि ३ चा वर्ग आहे ९; तसेच, ७ चा वर्ग ४९ हाही अंतर्भूत आहे. १३, ५७, १६०२, ४०२०४ या संख्यांना 'दत्तात्रय संख्या' म्हणतात. कारण, त्या संख्यांच्या वर्गाचे दोन किंवा अधिक हिस्से केले तर त्यांतील प्रत्येक हिस्सा हा पूर्ण वर्ग असतो.

(मुखपृष्ठ क्र.२ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

उदाहरणार्थ, $१३^२$ = १६९ (१६ आणि ९ हे पूर्ण वर्ग आहेत.)

$५७^२$ = ३२४|९;

$१६०२^२$ = २५६|६४|०४;

$४०२०४^२$ = १६|१६|३६|१६|१६

कापरेकरांनी वर्ग संख्यांमधील मजेशीर गुणधर्म शोधून काढले. उदाहरणादाखल ९ ही संख्या घेऊ. ९ चा वर्ग केला की ८१ मिळते. यात ८ आणि १ असे दोन अंक आहेत. त्यांची बेरीज केली की मूळ संख्या ९ मिळते. आता ४५ ही संख्या घ्या. ४५ चा वर्ग केल्यास २०२५ ही संख्या मिळते. यातील २० आणि २५ या संख्यांची बेरीज केली की मूळ संख्या ४५ मिळते. हाच नियम ७७७७ या चार अंकी संख्येला देखील लागू पडतो. अशा वैविध्यपूर्ण संख्यांना 'कापरेकर संख्या' असे म्हणतात.


वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म दाखविणारे अनेक अंक त्यांनी शोधून काढले. या एका गटाला त्यांनी 'हर्षद अंक' असे नाव दिले. हर्षद याचा अर्थ आनंद देणाऱ्या संख्या. या अंकाचे वैशिष्ट्य असे की, ते त्यातील अंकाच्या बेरजेने भागले तरी नि:शेष भाग जातो. उदाहरणार्थ १२ ही संख्या घ्या. यात १ आणि २ असे दोन अंक आहेत. ही संख्येला १+२=३ या अंकाने नि:शेष भाग जातो.

कापरेकरांनी आणखी काही वैशिष्ट्यपूर्ण संख्या शोधल्या. जसे १, १२१, १२३२१, १२३४३२१, इत्यादी. या संख्यांचे वैशिष्ट्य असे की, ते १, ११, १११, ११११ या संख्यांचे वर्ग आहेत. त्याचबरोबर ते उलटसुलट लिहिले तरी तीच संख्या मिळते. अशा संख्यांना ते 'डेमलो संख्या' असे म्हणत. मुंबई जवळच्या डोंबिवली गावात त्यांना या प्रकारच्या संख्या सूचल्या म्हणून त्यांनी या संख्यांना 'डेमलो संख्या' म्हणतात अशी नोंद आढळते.

नैसर्गिक संख्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मांचा ते आपल्या अध्यापनात उपयोग करत असत. त्यामुळे त्यांचे गणिताचे तास कंटाळवाणे न होता मनोरंजक होत असत. 'मनोरंजक गणिताचे प्रणेते' असे आपण त्यांना म्हणू शकतो. त्यांच्या गणितातील हुशारीमुळे कापरेकर सरांना त्यांचे सहकारी आदर देत असत. परंतु त्यांच्या कामाला देशात फारशी प्रसिद्धी मिळाली नाही. ते प्रकाशझोतात आले ते 'सायंटिफिक अमेरिकन' या नियतकालिकात १९७५ साली आलेल्या लेखामुळे. मार्टिन गार्डनर नावाचे एक अमेरिकन गृहस्थ या नियतकालिकात 'खेळ गणिताचे' अशा मथळ्याखाली एक सदर चालवित होते. या सदरात त्यांनी कापरेकरांनी जे मनोरंजक गणित विकसित केले त्याची माहिती दिली. हे नियतकालिक जगभर जाते. त्यामुळे कापरेकरांच्या कामाचा सर्वत्र गवगवा झाला. तसेच, त्यांचे नाव प्रख्यात गणितज्ज्ञ म्हणून 'द वर्ल्ड डिरेक्टरी ऑफ मॅथेमॅटिशियन' या स्वीडनहून प्रकाशित झालेल्या ग्रंथात समाविष्ट करण्यात आले.

कापरेकर यांच्या काळात प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ कोपर्निकस यांची ५०० वी जयंती १९ फेब्रुवारी १९७३ रोजी झाली. खगोलशास्त्र हा कापरेकर यांचा आवडता विषय होता आणि कोपर्निकस हे त्यांचे आवडते खगोलशास्त्रज्ञ होते. त्यांनी आपल्या आवडत्या खगोलशास्त्रज्ञाला गणिताच्या माध्यमातून वेगळ्याच पद्धतीने आदरांजली वाहिली. त्याच्या जन्मतारखेवरून जादूचा असा एक चौरस बनवला, की त्यातील उभी, आडवी, तिरपी बेरीज एकसारखीच म्हणजे ५९४ येईल.

(पृष्ठ क्र. २८ वर)



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष सव्वीसावे/अंक ७/जानेवारी २०२५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २९ वे/अंक ७ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | शेक्सपियर वाचनाच्या युक्त्या | डॉ. आशुतोष जावडेकर | २ |
| ३) | उंटांची अद्भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | ५ |
| ४) | नंदीवर्धन वा नगरधन | दिलीप ना. वंडलकर | १२ |
| ५) | कुंभमेळा - हिंदू अर्थव्यवस्थेचा अविभाज्य घटक | अमिता आपटे | १६ |
| ६) | संतसाहित्य जगणारे ह.भ.प. किसन महाराज साखरे | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | १९ |
| ७) | ब्रिटनच्या डोळ्यांत इस्लाम 'प्रेमा' चं झणझणीत अंजन घालणारा डग्लस मरे | श्री. हेरंब ओक | २१ |
| ८) | AT एनी कॉस्ट | चन्द्रशेखर टिळक | २६ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# शेक्सपियर वाचनाच्या युक्त्या

*विल्यम शेक्सपियर या थोर इंग्रजी नाटककाराच्या नाटकांचे वाचन कसे करावे यावरील युक्त्या प्रस्तुत लेखात मांडल्या आहेत – संपादक*

शेक्सपियरची भव्यता अनेकांना खुणावते आणि त्याचवेळी त्याचे एखादे नाटक प्रत्यक्ष पहिल्यांदा वाचायला सुरुवात केली की अनेकदा वाचक गडबडतात. 'विलायती वाचताना' सदराच्या मागच्या लेखात शेक्सपियरचे मोठेपण आपण जाणून घेतले. या लेखामध्ये त्याचा आस्वाद नव्या वाचकांनी न बिचकता घ्यावा म्हणून दहा युक्तीच्या गोष्टी सांगणार आहे!

१. **वाचनासाठी योग्य नाटक निवडा –** शेक्सपियरने सुखांतिका लिहिल्या, शोकांतिका लिहिल्या, दोन्हींचे मिश्रण असणाऱ्या tragi-comedies देखील त्याने तितक्याच यथार्थ रंगवल्या. त्याची काही नाटके ही दरबाराच्या पार्श्वभूमीवर आहेत, काहींचे सेटिंग हे एखादे रोमँटिक उपवन आहे, काही समुद्रात घडतात किंवा समुद्रकिनाऱ्यावर. आपल्याला कुठले कथानक वाचायला आवडेल याचा आधी अंदाज घेऊन एक नाटक पक्के करावे. प्रत्येक वाचकाचा एक पिंड असतो. आपल्याला पहिले नाटक वाचताना मेहनत घ्यायची आहे हे ध्यानात ठेवून, पिंडाला जवळ जाईल असे नाटक निवडावे. नव्या वाचकांना सोपे जाणारे एक महत्त्वाचे नाटक म्हणजे 'रोमिओ अँड ज्युलिएट'. एकतर ती कहाणी सरळ आहे, प्रेम आणि मृत्यू अशा म्हटलं तर नेहमीच्या पण तरी खोल जाणाऱ्या थीम्स आहेत. 'As you like it' ही आर्देनच्या अरण्यात घडणारी एक खुसखुशीत नाट्यरचना. त्यातली नायिका Rosalind ही माझी साहित्यातील स्थायीस्वरूपी क्रश आहे. गंभीर रचनेमध्ये मॅकबेथ ही नव्या वाचकांना सहन कळेल आणि आवडेल अशी शोकांतिका. राजकारण आणि सत्ताकारण यावर आधारलेले ज्युलियस सीझर हे नाटक देखील त्यातील संवादांसाठी विशेष खुमासदार. टेम्पेस्ट हे तुलनेने कमी वाचले जाणारे नाटक. त्यातील अद्भुतता, जादुई वातावरण आणि क्षमाशीलता ही देखील लोभस. हिंसा आणि रक्तपात यांची आवड असेल तर एकदम टायटस अँड्रोनिकस!

२. **नाटकांचे गोषवारे वाचा :** अर्थात आपल्याला मानवेल असे नाटक निवडण्याआधी त्याचा काही नाटकांचे गोषवारे (अर्थात 'समरी') ही अवश्य वाचून घ्या. साधे गुगल केले तरीही शेक्सपियरच्या नाटकांची संक्षिप्त रूपात कथानके सापडतात. त्यातही माझी एक महत्त्वाची टीप अशी की, शेवट वाचू नका! शेक्सपियरच्या नाटकांचे शेवट हे अनेकदा कलाटणी देणारे असतात! पण आधीचा गोषवारा वाचून आपल्याला विषय आवडेल का याचा अंदाज जरूर घ्या. मागच्या लेखात उल्लेख केलेली आशा राजवाडे आणि शिरवाडकर यांची मराठी पुस्तके यासाठी उपयोगी ठरतील.

३. **थीम विचारात घ्या –** शेक्सपियरची काही नाटके ही अत्यंत स्थानिक संदर्भ घेऊन उभी असलेली आहेत. परंतु सहसा संदर्भ कुठलेही असले तरी त्या नाटकाची थीम ही वैश्विक असते. उदाहरणार्थ, माझ्या मते ऑथेल्लो हे नाटक म्हणजे असूया या विषयावरील अंतिम शब्द आहे! महत्त्वाकांक्षा आणि सत्तेचा मोह हे तर शेक्सपियरच्या अनेक नाटकांमध्ये आढळतात. एकदा मध्यवर्ती सूत्र ध्यानी घेतले, की निवडलेले नाटक वाचताना फोकस स्वच्छ राहील. मला आठवतंय, एकदा मैत्री हे सूत्र बघत Two Gentlemen of Verona नाटक

वाचायला घेतले आणि एकदम एक झळझळीत वाक्य समोर आले : "A friend is one that knows you as you are, understands where you have been, accepts what you have become, and still, gently allows you to grow!" अहाहा! मैत्रीची अशी व्याख्या शेक्सपियरच करू जाणे! विशेषतः त्यातील शेवटचे allows you to grow (आणि तेही जेन्टली !) हे विधान फार मोठे आहे.

**४. समकालीन भाषा अनुवाद असलेले पुस्तक निवडा –** शेक्सपियरची जुनी भाषा एकदम आपल्याला कळत नाही. त्यामुळे निदान सुरुवातीला त्याची नाटके वाचताना ज्या पुस्तकांमध्ये डावीकडच्या पानावर मुख्य संहिता आणि उजवीकडच्या पानावर त्याचा आत्ताच्या इंग्रजीमधील केलेला अनुवाद असेल असे पुस्तक निवडा. अनेक इंग्रजी प्रकाशकांची तशी पुस्तके आहेतच, पण आपल्याला भारतात सहजपणे दिल्लीमधील युनिक पब्लिशर्स यांची पुस्तके मिळतात. ती अतिशय उपयुक्त आहेत. खेरीज युनिकच्या पुस्तकांमध्ये नुसती संहिता आणि अनुवाद नसून, पुढे त्याचे विश्लेषण देखील असते. मागच्या लेखात सांगितले तसे SparkNotes सारख्या वेबसाईट या संदर्भात उपयोगी आहेतच. अर्थात कधीतरी शेक्सपियर इतके सहज, समकालीन असावे असे लिहितो, की आपण अवाक होतो. ऑथेल्लो मधील हे वाक्य बघा : "take note, take note, O world, To be direct and honest, is not safe!" (मंडळी ध्यानात ठेवा, प्रामाणिक आणि सरळ स्वभावाचं असणं हे जगात सुरक्षित नसतं!)

**५. जुन्या भाषेतील महत्त्वाचे शब्द जाणून घ्या –** याची स्वतंत्र यादी सोबत देतो आहे. अनेक जुन्या इंग्रजीचे शब्द आपल्याला नाटकांमध्ये पुन्हा पुन्हा भेटतात. आपण वाचत गेले की आपल्याला ती एकंदर लेखनशैली कळते आणि त्याची मजा येते. It's ऐवजी 'Tis हे त्याचे गमतीशीर उदाहरण!

**६. नाटकातील आवडलेला भाग मोठ्याने वाचा :** मुळात हे नाटक आहे ही गोष्ट आपल्या मनात पक्की पाहिजे. आणि त्यामुळे आपल्याला आवडलेला भाग जणू आपण अभिनेता बनत वाचला तर अर्थाला अधिक धुमारे फुटतात, शब्दांची ताकद नव्याने कळते, आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्यातील नाट्यमयता लक्षात येते. Twelfth Night ( Act 1, scene1) मधील हे विधान मोठ्याने आणि सहज वाचून बघा : "If music be the food of love / Play on!" साध्या वाक्यात त्या प्ले ऑन नंतर येणारा पॉज, ती शांतता, संगीताचा आधीच संदर्भ आणि पुढची निस्तब्धता हे सगळं किती विलक्षण आहे आणि मोठ्याने वाचताना ही अशी मजा भेटत जाते.

**७. टप्प्याटप्प्यात वाचा :** शेक्सपियरच्या नाटकाला भिडताना ही एक गोष्ट कायम लक्षात ठेवायला हवी की, हे नाटक हातात पुस्तक घेतले आणि वाचून संपवले असे होणार नाही. म्हणजे केवळ भाषा अवघड म्हणून नव्हे, तर त्यातील विचार देखील एकदम मनात आत झिरपत नाहीत. शेक्सपियर 'जगण्याचे व्यामिश्र अंग' दाखवतो. ते समजून घेताना थोड्या शांत लयीमध्ये वाचन आवश्यक आहे. एखादा ॲक्ट, त्यातील एखादा सीन असे उद्दिष्ट ठेवून हळूहळू वाचत जावे. याबाबत मराठी मधील, 'लहान तोंडी मोठा घास' ही म्हण अचूक आहे! म्हणजे हेरोल्ड ब्ल्यूम सारखे संपूर्ण आयुष्य शेक्सपिअरच्या नाटकांचा अर्थ समजून घेण्यात व्यतित केलेली मंडळी सोडून द्या. बाकी आपल्या सगळ्यांचंच तोंड शेक्सपियरपुढे लहान असतं!

**८. शेक्सपियर वाचकांच्या व्हाट्सअप किंवा फेसबुक ग्रुप मध्ये सामील व्हा :** सगळ्या समाजमाध्यमांवर शेक्सपियरची नाटके आनंदाने आणि जागृतपणे वाचणारी अनेक मंडळी आहेत. आणि त्यांचे कंपू देखील आहेत. अशा एखाद्या ग्रुपमधील चर्चा नुसते वाचणे हे देखील आपल्याला प्रेरक ठरू शकते. कधी आपल्याला

वाचताना अडचणी आल्या तर तिथे न संकोचता विचारले तर आपल्याला अनेक मंडळींचे अन्वयार्थ कळू शकतात. आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, आपल्याला यानिमित्ताने समधर्मी भेटतात! तुम्ही छोट्या गावात शेक्सपियरचे नाटक वाचताना तुम्हाला कदाचित अगदी एकटे वाटेल, आसपास तशी आवड नसलेले कोणी नसेल, परंतु समाज माध्यमांच्या अशा ग्रुपमध्ये गेल्यानंतर तुम्हाला जाणवेल की, जगात तुमच्यासारखी हजारो मंडळी आहेत आणि तुम्ही एकटे मुळीच नाही!

**९. ऑडिओ पॉडकास्ट आणि नाटकांचे युट्युब व्हिडिओ –** शेक्सपियरची अनेक नाटके आज ऑडिओ बुक, पॉडकास्ट आणि youtube वर व्हिडिओ या माध्यमात उपलब्ध आहेत. ती नाटके बघणे हा आनंद असतो. आज देखील इंग्लंडने एलिझाबेथन नाट्यपरंपरा जपलेली आहे. आजही तेथील कसलेले अभिनेते तो जुना पाचशे वर्षांपूर्वीचा काळ सहज जिवंत करतात. त्यामुळे आपल्याला असे व्हिडिओ बघताना किंवा ऑडिओ ऐकताना समजा लगेच अर्थ कळला नाही तरी एकंदर शेक्सपियरच्या नाटकाचा माहोल लक्षात येतो. चित्रपटांमध्ये 'शेक्सपियर इन लव्ह' हा चित्रपट पुन्हा पुन्हा बघण्यासारखा. आणि जर तुम्ही स्वतः लंडनला गेलात तर शेक्सपियरचे स्ट्रॅटफर्ड अपॉन इव्हन येथील घर तर बघाच; पण लंडनमधील टेमस किनारी असलेले पुन्हा बांधून काढलेले ग्लोब थेटर देखील जरूर अनुभवा.

**१०. काव्य अनुभवा :** सगळ्यात महत्त्वाची युक्ती मीही सांगेन की, प्रत्येक शब्दाच्या अर्थमागे जाऊ नका, धावू नका. त्या नाटकामधील जे काव्य आहे ते प्रत्यक्ष शब्दाचा अर्थ कळला नाही तरी तुमच्या आत भिडत जाणार आहे. आणि तेच अधिक मोलाचे आहे! त्यातील नादमयता टिपायला विसरू नका. ऑथेल्लोचा विषय चालला होता म्हणून त्यामधीलमधील सहज आठवलेले वाक्य लिहितो. इयागोने ऑथेल्लोचे कान भरले आहेत. आता सुडाच्या भावनेने पेटलेला ऑथेल्लो म्हणतो : "O, blood, Iago, blood !" तीन स्वल्पविराम आणि चार शब्दांचं साधं वाक्य! पण त्यामधील ब्लड या शब्दाची अचूक पुनरुक्ती केवढा परिणाम साधते! हे काव्य वाचणे हे सगळ्यात अधिक महत्त्वाचं आहे! As you like it मधील जग हे रंगभूमी आहे या भागातील ती आयुष्याची सप्तपदी! One man in his life plas many parts, His acts being seven ages. At first, the infant.... असे म्हणून बाळापासून ते वार्ध्यक्यापर्यंत शेक्सपियर येतो. मधल्या तरुण वयात कसा असतो पुरुष ? तर – And then the lover, sighing like furnace... आणि मग व्यवहाराचे तडाखे खाल्यावर तो काय बनतो ? - Then a soldier! Full of strange oaths, jelous in honour, sudden in quarrel. आणि मग शक्ती कमी होते, वार्धक्य येतं, सातवी अवस्था सुरू होते. आणि मग शेक्सपियर म्हणतो की, 'शेवटचा नाटकाचा अंक जो हे नाट्यमय आणि विचित्र आयुष्य संपवतो (strange eventful history) ते म्हणजे दुसरं बालपण आणि केवळ शून्यपण – दात पडतात, डोळे ठाकतात, चव जाते, सगळे सगळे नाहीसे होते!' – Last scene of all, That ends this strange eventful history, is second childishness and mere oblivion, Sans teeth, sans eyes, sans taste, sans everything. अजून काय यापुढे लिहावे? शेक्सपियर हा माझा गुरूच, त्याला या टप्प्यावर वंदन करून आज थांबणे श्रेयस्कर!

कठीण किंवा अपरिचित जुन्या शब्दांची यादी आणि त्याचे अर्थ :

यातले Ay, Prithee, Thou हे शब्द माझे खास आवडीचे.

1. Thou, Thee - You, You.
2. Thine, Thy - Your, Your.
3. Art - Are

(पृष्ठ क्र. ११ वर)

# उंटांची अद्भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... – संपादक*

(मागील अंकातील लेखाचा उर्वरित भाग...)

त्याचा चरण त्याला सांगतो की, सायरा बधानीकडे काही उंट असतात. चरण म्हणजे कोण ते तिला माहीत असते. ते वंशशास्त्रज्ञ किंवा वंशावळीचे अभ्यासक असतात. सायरा बधानीला त्याच्याकडे असलेले उंट पाबुजीला द्यायचे असतात. पण पाबुजी नाकारतो. कारण त्याला द्यायला पाबुजीकडे काही नसते. सायरा बघानी त्याच्याकडे चरण मागतो. पाबुजी तयार होतो. म्हणून आताही चरण हे दोघांसाठीही काम करतात. हिंदू व मुस्लीम. नंतर प्रोफेसर मेहर तिला उंट व सिंधी मुस्लीमांविषयी अनेक मनोरंजक गोष्टी सांगतात. ते तिला सांगतात की, जैसलमेर जवळ नाचणा गावांतील उंट अतिशय प्रसिद्ध आहेत. ते इतके प्रसिद्ध होते की, सर्व उंटपालक नाचणाच्या नावाने शपथ घेत असत. ते तिला नाचणाच्या उंटांना भेटायला सांगतात. आता त्यांना पुष्करला जायची घाई होती. डॉ. देवारामनी कार्यक्रमांत आणखी एका गोष्टींची भर घातली. त्यांच्या जायच्या रस्त्यावर रात्रीच्या वेळी एक समारंभ साजरा होणार होता. ते लग्नही नव्हते किंवा साखरपुडाही नव्हता. देवारामने सविस्तर सांगितले की, रायकांच्या मुलांचे लग्न त्यांच्या बाल्य अवस्थेतच होते, किंवा एक दुसऱ्याला द्यायचे ठरविले जाते. पण जेव्हा मुलं वयांत येतात किंवा विशीत असतात तेव्हा बरोबर राहायला लागतात. जेव्हा ते बरोबर राहायला सुरवात करतात तेव्हा आणखी एक कार्यक्रम असतो. त्याला, 'अना' असे म्हणतात, तेव्हा तिचे; तिच्या आईवडिलांकडून तिच्या सासरी प्रयाण होते. हा बदल हळूहळू असतो. ती तिच्या मूळगावी काही दिवस राहते. नंतरच आपल्या सासरी येते. नवऱ्याबरोबर राहण्याचा काळ हळूहळू वाढतो. पण ती पहिल्या बाळंतपणाला परत माहेरी जाते. जास्त खर्च मुख्य समारंभ साखरपुड्याचा असतो. गावातील सर्व लग्न न झालेल्या मुलींचा एकदम साखरपुडा होतो. त्या दिवशी ११ जोडप्यांचे लग्न होणार असते. बाल विवाह सरकारने बंद केले आहेत व ते बेकायदेशीर ठरवले जातात. म्हणून पोलिसांच्या रेडचा धोका असतो. कोणीच बाहेरच्या व परदेशी व्यक्तीने हा समारंभ बघितलेला नसतो. पण म्हणून तिच्या कामामुळे व सहभागामुळे तिला हजर राहण्याची परवानगी मिळते.

ते रात्री ९ वाजता आले. तिथे मिट्ट काळोख होता. त्यांना दिशा कळत नव्हती. तिला अनेक पार्क केलेले टॅक्टरस् कळत होते. लोक इकडून तिकडे फिरत होती. लग्नाचे विधी पहाटेपर्यंत चालू होणार नव्हते. देवारामने तिला एका अतिशय उंच काटेरी कुंपणाच्या वळणावळणाच्या वाटेने एका घराकडे नेले. जेथे १० लोक संपूर्ण ब्लँकेट गुंडाळून एका शेकोटी भोवती बसले होते, तर चार लोक एखादी सूर्याच्या आकाराची छत्री उलटी करावी एवढ्या मोठ्या कढईत झाडूएवढ्या लांब लोखंडी डावाने ढवळत होते. त्यांत एक गुळगुळीत, लापशी हा एक गोड पदार्थ, फोडलेला गहू, तूप व काकवी यापासून करत होते. हा ठरलेला मेनू लग्न प्रसंगी किंवा इतर समारंभात असे.

ती स्वतःला आक्रसून घेत व कोणाच्यामध्ये अडथळा न आणता, देवारामच्या शेजारी बसली. देवाराम

प्रदीर्घ संभाषणामध्ये मग्न होता.

तिच्याभोवती चाललेल्या गंभीर चर्चेचा मतितार्थ समजावून घेण्याचा प्रयत्न केला व ती झोपेच्या आधीन झाली. बऱ्याच वेळाने देवारामने निघायला सांगितले. जमलेल्या दाट गर्दीतून त्याने तिला गावाच्या आत नेले. तिला अंगणात सर्व दागिन्यांनी सजवलेला उंट दिसला. गळ्यातील हार, छातीवरचे कव्हर, खोगीर, धोट्याची साखळी, विशेष समारंभासाठी उंटाचा खास पोषाख असतो. आत एका बकळवर सहा मुलगे, एक कडेवर बसणाऱ्यापासून, जो बसूही शकत नव्हता व किशोरवयातील मुलगे (पौगंडावस्थेतील) बसले होते. त्यांनी भपकेदार गुलाबी व लाल फेटे घातले होते, त्यांच्या डोळ्यांच्या कडांना काजळ लावले होते. त्यांच्या चेहेऱ्याला पावडर लावली होती. पण हा सर्व झगमगाटाचा परिणाम त्याच्या गंभीर चेहऱ्यांनी व अस्वस्थपणे रुमाल चेहेऱ्यावर रुमाल फिरवत राहिल्यामुळे नाहीसा झाला. एक पंडित त्याच्या कपाळावर कुंकू लावत होता.. अचानक तिच्यावर लक्ष केंद्रित झाले. लोक तिच्याकडे एकटक पाहत होते, कारण ती एक गोरी त्वचा असलेली होती. तिने डॉ. देवराम यांना तेथून निघण्याचे सांगितले. त्यांनी आग्रह धरला की, पुढचा विधी, वरांना उंटांवर बसवले जाते व समारंभासाठी खास लाकडापासून बनवलेल्या तोरणाला त्यांच्या तलवारींनी त्यांनी स्पर्श करायचा हे बघण्यासाठी आपण थांबू. पण इल्सची थांबायची तयारी नव्हती, आणि ती तिच्या म्हणण्यावर ठाम राहिली.

त्यांच्या सोबत कोणीतरी गाडीपर्यंत आले. त्यांनी ड्रायव्हरसाहेबांना उठवलं. त्याला पुष्करला जाण्यासाठी रस्ता सांगितला. मागच्या सीटवर ताणून, हायवेच्या कडेने उडणाऱ्या अंबॅसिडरच्या ड्रोनने तिला लगेच झोप लागली आणि तिला जाग आली तेव्हा दिवस उजाडला होता. हणमंत रस्त्याच्या कडेला चहासाठी ढाब्यावर थांबला होता. डॉ. देवराम अजूनही समोरच्या सीटवर झोपलेलाच होता. हणमंतला तिचे लग्नाविषयीचे मत ऐकायचे होते. पण तिला त्या विषयी काही बोलायचे नव्हते. तिने पुष्करकडे विषय वळवला. पुष्कर तिथून फार लांब नव्हते.

मला पुष्कर येथे उंट विकत घ्यायचा आहे.

तुम्हाला पुष्कर येथे उंट विकत घ्यायचा आहे का? वावा! आणखी एक कप चहा घ्या. हणमंत म्हणाला, थोडे थांबल्यावर त्याने परत विचारले, तुला उंट का घ्यायचा आहे?

तिने उत्तर दिले नाही. उंट विकत घ्यायची कल्पना बरेच दिवसांपूर्वी तिच्या मनात रुजली होती. तिला उंटाचा मालकी हक्क मिळवण्यासाठी उंट घ्यायचा नव्हता. ही धोरणात्मक फायद्याची चाल होती. ही कल्पना तिच्या मनात स्पष्ट झाली होती. जेव्हा तिने काही उंटपालकांना ते दुसऱ्यांचे उंट कसे पाळतात व अनेक प्रकारचे फायदे वाटून घ्यायच्या कल्पनेवर हे आधारित होते हे तिने ऐकले होते. तिला वाटले, तिने तिचा उंट दुसऱ्याला सांभाळायला दिला तर ते कायदेशीर असेल. अनुपस्थित उंट मालक म्हणून तिला प्रश्न विचारायचा हक्क राहिल. तिलाही खूप काही शिकता येईल. लोकांनाही कळेल की ती खरोखरच मनापासून रस घेत आहे. उगीचच नाक खुपसत नाही. हे तिला त्यांच्यातील व्यक्ती बनवेल. अशी तिने आशा केली.

तिला जी अतिशय उत्कृष्ट कल्पना वाटली होती त्या विषयी डॉ. देवाराम फारसा उत्सुक नव्हता. त्याने विचारले, तुला स्वतःला आणखी जबाबदारी कशाला वाढवायची आहे? ते खूप. खर्चिक आहे व त्यातून तुला काय मिळणार आहे?, ठीक आहे. मला स्वतःचा उंट असायला आवडेल. म्हणून मला मदत कर. ती सांगते, हो नक्कीच, जर अशीच तुझी इच्छा असेल तर आपण तसे करू. देवारामने नमते घेत उत्तर दिले.

तिने स्वतः आधीच किमतींची माहिती करून घेतली होती. तिला मादी उंट घ्यायचा होता. जिला पुढे संतती होईल व त्यांचा छोटासा कळप तयार होईल. मादी उंटांची किंमत खूप किफायतशीर असे. ३०००रु. व काहीं शेकड्यांत त्याची काळजी घेण्याचे वर्षांचे पैसे हे खूप वाजवी होते. तिची ही खूप चांगली गुंतवणूक असेल. कारण ही त्यांच्या समाजाशी संबंध वाढवेल व काही उंटांच्या कळपावर शास्त्रीय माहिती मिळण्यास मदत होईल व उंट-पालकांचे प्रयोग व त्यातील कष्टही समजतील. तिचे उंट वाढतानाही तिला बघायला मिळेल व हे सर्व विचार खूप आशादायक होते.

ते पुष्करला दुपारी पोहोचले. गर्दीने व दूषित हवेने भरलेले अजमेर सोडल्यावर रस्त्यावर पर्वत चढायला अनेक तीव्र वळणे लागली. जेथून अतिशय विस्तृत वाळूच्या मैदानाचे सुंदर दृश्य दिसले. त्यामध्ये पुष्कर वसलेले होते. ते मुख्यत; शांत व चिंतन करण्याचे स्थळ होते. तेथे हिंदू पुरुष पाश्चिमात्य हिप्पीं बरोबर सहकार्याने राहतात. हजारो हिंदू यात्रेकरूंबरोबर, पशुधन विक्रेते, पाश्चिमात्य प्रवासी, खरेदीदार आपल्या हिंदू कॅलेंडरप्रमाणे दहा दिवस कार्तिकी महिन्याच्या पौर्णिमे पर्यंत असतात. तिथे रेटारेटी घाई, गडबड असते. त्यांनी ठरवल्यापेक्षा ते उशीराने आले. यात्रा पूर्णत्वाला पोहोचली होती !

टोल बुथवर त्याचा कर दिल्यावर त्यांची अंबॅसिडर माणसांच्या गर्दीने घेरली होती व माणसांचे लोंढे मुख्य रस्त्यावरून आपली वाट काढत निघाले. गाडी इंचभरही पुढे सरकू शकत नव्हती. अर्ध्या तासाने प्रवासी गाड्यांचा पार्कींग लॉट आला. आता ते पायाने चालू शकत होते.

जरी मेळाव्या विषयी पहिले मत गोंधळ व गोंगाटाचे असले तरी, हा मेळावा म्हणजे व्यवस्थापन व नियोजनाचे उत्तम उदाहरण होते. नाहीतर हजारो प्रवासी, तेवढ्याच प्रमाणांत उंट, जनावरे, घोडे व इतर प्रासंगिक जनावरे यासर्वांना कसे सामावून घेता आले असते? त्यांना खायला घातले, पाणी पाजले, व त्यांनी केलेला एका आठवड्यापेक्षा जास्त कचरा निर्जंतुकीकरण करून स्वच्छ केला. मेळावाच्या मैदानांत अनेक सुव्यवस्थित क्षेत्रांचा समावेश आहे. तेथे करमणुकीसाठी जागा होती तेथे कौटुंबिक सर्कस बघता येत होती. जादुगारांना पाहाता येत होते. आकाश पाळण्यात बसता येत होते. विचित्रतेचे किंवा विक्षिप्तपणाचे प्रदर्शन बघता येत होते. बकरीच्या पिल्लाला दोन डोकी या भागांत अतिशय गर्दी असते. येथे मानवी प्रवाहाबरोबर पुढे जाण्याशिवाय पर्याय नसतो. तुलनात्मकदृष्ट्या पर्यटकांसाठी आरक्षिलेलं क्षेत्र शांततेची मरूभूमी आहे. पण चहा व जेवण स्थानिक लोकांसाठी वीसपट महाग होते. तेथे मोठ्ठा स्टेडियम आहे. जेथे प्रयोग (खेळ) होतात व पशुधनाचेही प्रदर्शन होते. तेथे तंबूतील बाजारांत रांगेत दुकाने असतात व ती गावांतील जीवनांत लागणाऱ्या सर्व वस्तुंची विक्री करतात. खोगिराला लागणारे कातडी सामान, अन्न भरवायच्या सर्व आकाराच्या टोपल्या. धंटा, उंटांचे दागिने, ब्लॅकेंटस्, लोखंडी आवजारे, तात्पुरती उभारलेली रेस्टॅारंटस् चहाचे स्टँडस. तेथे एक व्हेटरनरी हॅास्पिटलही आहे. जिथे जनावराच्या मालकी हक्काच्या बदलाची नोंद करावी लागते व खरेदीबद्दल आकडेवारी मोजली जाते.

तेथे सार्वजनिक पत्ता प्रणाली आहे. (public address system) ती हरवलेल्या मुलांबद्दल व स्टेडियमवरच्या कार्यक्रमाबद्दल घोषणा करते. परंतु जास्तीत जास्त वेळेला धार्मिक गाण्यांचा मोठ्ठा आवाज असतो. ज्या भागामध्ये त्यांना स्वारस्य होते तो परिघाच्या वाळूच्या टेकड्यांचा भागांत जेथे रायका व इतर पशुधन विक्रेते त्यांच्या घोडे व बैल यांच्याबरोबर तळ ठोकून होते.

ती डॉ. देवारामच्या पाठीमागे गेली, जो तिच्यापुढे कष्टाने चालत होता. खोल वाळूमध्ये व कडक उन्हांत

व आणि पांढऱ्या वाळूतून परावर्तित होणारा प्रखर सूर्यप्रकाश थकवणारा होता, ती धापा टाकत उंटांनी भरलेली टेकडी चढली. त्यांच्यापैकी अनेकांच्या शेपटीला लाल रिबीन बांधली होती; हे दाखवायला की ते विकले गेले होते.

टेकडीच्या माथ्यावरून पशुधनाच्या जागेचे उत्कृष्ट विहंगावलोकन करता येत होते, जी अमर्यादपणे पसरली होती. डॉ. देवारामने लगेचच काही परिचित चेहेरे ओळखले. त्याने तिला अंजी-की-धानीचा डेरा बघायला सांगितला. प्रत्येक वर्षी ते याच ठिकाणी येतात व त्यांचा तळ त्याच जागी ठोकतात. येथे कॅम्प म्हणजे फक्त काही ब्लँकेट्स, पाण्याचे भांडे आणि एक शेकोटी.

'योग्य मादी उंटांबद्दल काही चौकशी करतो' असे सांगून देवाराम निघून गेला. तिने अशी कल्पना केली होती की, ते दोघे मिळून बरेच उंट बघतील. प्रत्येकावर साधकबाधक चर्चा होईल, आणि नंतर महत्त्वाचा निर्णय घेतील. महत्त्वाच्या असलेल्या वैशिष्ट्यांबद्दल आणि व्यवसाय चालवण्याच्या पद्धतीबद्दल ती शिकू शकेल. ती चहाचा घोट घेत होती, ज्याला ती ओळखत नाही अशा एका व्यक्तिने आणून दिला. अर्ध्या तासानंतर देवराम चेहऱ्यावर समाधानी हसू घेऊन परतला. 'मला तुमच्यासाठी एक उंट सापडला आहे. मला वाटतं की, तो अंजी-की-धानीचा, सुमारे चार वर्षांचा मादी उंट आहे, तो बघून घ्या.' त्याने तिला काही शे फुटांवर नेले आणि उंटाकडे इशारा केला. 'ती, ती आहे. तुला ती आवडते का?'

तिने त्या उंटाभोवती गोल फेरी मारली. तो तिला रंग व उंचीच्या बाबतीत अगदी साधा वाटतो. तिने त्याचे पाय व पावलेही तपासली, त्याला सर्व बाजूंनी परत तपासले. तिने त्याला बसवायला व उभे करायला सांगितले, त्याचे दातही तपासले. त्याला चालायला व दुडक्या चालीने धावायला सांगितले. जसे आपण घोड्याला लावतो. इल्स तिच्या डोळ्यांत बघते की, तिला वाटते की, तिच्या व्यक्तिमत्त्वात ती इल्सशी काहीतरी बोलेल व त्या दोघींमधे संबंध प्रस्थापित होइल. इल्स उंट खरेदी करण्याबद्दल गोदवारला शिकलेली असते ते आठवण्याचा प्रयत्न करते. 'एवढे नक्की पहा की त्याचा खांदा व स्तन पॅडमध्ये पुरेसे अंतर आहे. तुमच्याकडे बघितल्यावर जो उंट लघवी करतो त्याला खरेदी करू नका. पण जो लगेच शी करतो त्याला खरेदी करा', त्याच क्षणी तिने शेपूट वर केले व शी केली. म्हणजे आता नक्की झाले की तिच्यात काही खोट नव्हती. ती निरोगी व चांगल्यी स्वभावाची दिसली.

त्यांना इल्सला ती फक्त २,२०० रुपयाला द्यायची असते. 'पण तुला खात्री आहे की तिच्यांत काही खोटं नाही, ती वांझ नाहीना?'

ती गर्भवती का नाही? इल्स विचारते.

'ती वांझ नाही. ती अद्याप गर्भवती नाही कारण ती अजूनही खूप तरुण आहे. या हिवाळ्यात ती गर्भवती होईल, मग मालक कोण? तो तिला का विकतोय? ती म्हणते, रायकाने कोणतेही मादी उंट विकायचे नसतात. हे त्यांच्या जातीच्या नियमांच्या विरुद्ध नाही का? हो, पारंपरिकपणे तस आहे, परंतु आता काळ बदलत आहे व तुम्ही जवळजवळ समुदायाचा भाग आहात आणि मालकाला पैशांची गरज आहे. आजकाल रायका खूप गरीब आहे. तर मालक कोण आहे?' इल्स विचारते.

अंजी-की-धानी, येथील अडोजी. तुम्ही त्याला आधीच ओळखता. आपण त्याच्या कळपाला भेट दिली आणि एक रात्र त्याच्या घरी राहिलो.

तुला आठवतंय! का? अरे वा! तो अडोजी आहे का? छान इल्सने विचारले की, तिने त्या उंटाला खरेदी केले तर त्याच्याकडे कोण बघेल? देवारामने त्या विषयी अडोजीला विचारले. अडोजीने सांगितले की, ती त्याच्या

कळपा बरोबर राहू शकते. तो महिन्याचे २० रु. घेईल. देवाराम म्हणाला ही चांगली व्यवस्था आहे. सर्व काही आधीच ठरवलेले होते. नेहमी प्रमाणे तिच्या शिवाय. तिने तिचा उंट जेथून तो आला त्यापेक्षा दुसऱ्या कळपांत ठेवणे जास्त पसंत केले असत. तिने अडोजीला २२००रु. दिले. तो उंट त्याच्या बरोबर परत घेऊन जाईल व त्याला संभाळण्यासाठी त्याला पैसे मिळणार होते. हा त्याच्यासाठी अतिशय सोईस्कर करार होता. पण तिला झालेली संतती तिच्याकडे राहणार होती. खरे म्हणजे ते अतिशय नशिबवान होते. त्यांना उशीर झाला होता. त्यामुळे मादी उंटांचां फारसा प्रस्ताव नव्हता. बहुतेक उंट विकले गेले होते व जे शिल्लक होते ते प्रजननासांठी योग्य नव्हते. यामुळे अंजी–की–धानीच्या लोकांबरोबर तिचे संबंध जास्त घट्ट होणार होते. आता तिला त्यांना भेटण्यासाठी कायदेशीर कारण होते. यापुढे ती आगंतुक असणार नव्हती., नंतर तिच्या उंटाने डोके फिरवले व अतिशय भावपूर्णपणे तिच्याकडे पाहिले. तिला परत तिच्या नेहमीच्या ओळखीच्या लोकांबरोबर जायला सुटल्या सारखं वाटलं असणार.

'मी तिला विकत घेते.' तिने देवारामला सांगितले जो तिच्याकडे अपेक्षेने बघत होता. तिला वाटले होते की आता कसला तरी विधी होईल, तिची खरेदी निश्चित करण्यासाठी म्हणजे हस्तालोनंदना सारखा जसा युरोपमध्ये होतो. करार पुरा झाल्यावर.

'अभिनंदन. आता आपल्याला तिच्या शेपटीला लाल रिबीन बांधायला लागेल. मेळ्याच्या प्रशासनाकडून पेपर घ्यायला लागतील. मगच तुम्ही पुष्कर सोडू शकाल. तुला तुझ्या उंटासाठी डोक्याची फ्रिल व दोरी विकत घ्यायची आहे का?', ''हो. नक्कीच. हां, आणि मी, माझ्या उंटाला 'मीरा' या नावाने हाक मारणार आहे.'' इल्सने साांगितले. तेथे असलेल्या सर्वजणांना अतिशय मजा वाटली. कारण हे नेहमीच्या ठरावीक नावातील नाव नव्हते. मीराला आदराने 'मीराबाई' म्हटले जायचे.

रायकाने त्यांच्या उंटांना दिलेल्या प्रमाणित नावांपैकी ते एक नव्हते. मीरा, ज्याला आदराने मीराबाई म्हटले जाते, ही एक मध्ययुगीन संत होती, जिच्या कवितेने भगवान कृष्णाने तिला संपूर्ण उत्तर भारतात प्रसिद्ध होती. ती राजस्थानच्या इतिहासातील एक प्रसिद्ध स्त्री आहे. त्यांनी रिबीन बांधली आणि मीरासाठी रंगीबेरंगी हॉल्टर खरेदी केले. त्यात ती चांगली दिसली आणि इल्सने प्रेमाने तिच्या मानेभोवती थोपटले. मग तिला आडोजीच्या कळपाकडे सोडले जे त्या रात्री अंजी–की–धानीला निघणार होते. ती एका आठवड्यानंतर तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करणार होती. देवराम काही तातडीच्या कौटुंबिक व्यवसायाची काळजी घेण्यासाठी निघण्यास उत्सुक होता उंटांच्या आरोग्याच्या स्थितीबद्दल आणखी काही माहिती गोळा करण्यासाठी त्यांनी साधारण एका आठवड्याच्या कालावधीत साद्री येथे भेटण्याचे मान्य केले.

यादरम्यान, हणमंत आणि तिने संबंधित ऐतिहासिक वास्तूंचा त्यांचा दौरा सुरू ठेवला, आणि राजस्थानच्या पूर्वेकडील काही उंटांचे चित्रण पाहण्याचे ठरविले. प्रथम त्याना पुष्करमधून स्वतःला बाहेर काढावे लागणार होते जे त्यात प्रवेश करण्यापेक्षाही कठीण होते. आधीच जलमय आणि गर्दी झालेल्या शहरात लोक आणि वाहने सतत वाहत होती. बाहेर पडणाऱ्या धुराचा थर रस्त्यावर पसरला त्यांच्या गाडीच्या खिडक्यांवर टक्टक् करणाऱ्या भिकाऱ्यांच्या रडण्यासोबत सदैव चालू असलेल्या लाउडस्पीकर सिस्टीममधून हिंदू भक्तिसंगीताचा मोठा व कर्कश्य आवाज येत होता. दरम्यान अंबॅसिडर कार फक्त (सरपटत) हळूहळू पुढे जाऊ शकत होती. आश्चर्य म्हणजे हनमंत त्याच्या नवीन गाडीला बसणाऱ्या धक्क्यांनी व ओरखाड्यानी ही शांत होता.

लवकरच त्यानी त्या गोंधळातून मार्ग काढला. हणवंतला जे घडले ते ऐकायची इच्छा होती. तिने

त्याला सर्व सविस्तर वृत्तान्त सांगितला व तिची गोष्ट तिने उंटाला दिलेल्या नावाने संपवली. हणमंत म्हणाला, की ते फार चांगले नाव आहे. नंतर थोडावेळ थांबून हसून त्याने सांगितले की, मीराबाई त्याची नातेवाईक आहे. मीराबाइ ही मेरतामध्ये जन्मली व ती त्याच्या जातीतील आहे. मरतिया राजपूत. तोही मरतिया आहे. मरतिया हे राठोड राजपुतांचे गोत्र आहे.

आजचा दिवस अजिबात वाईट नव्हता. ती उंटाची मालकीण झाली होती. समाधानाने ती मागे रेलून बसली व तिने छोटीशी झोप काढली तेव्हा ते बुंदी व कोराकडे निघाले होते. त्यांचा मार्ग चंबळ नदीवरून जात होता व नदी समृद्ध भूप्रदेशावरून व दाट हिरव्या जंगलातून वळणे घेत जात होती. 'हा प्रदेश डाकूंसाठी प्रसिद्ध आहे. आपल्याला सावध राहिले पाहिजे.' हणमंत म्हणाला. 'नक्कीच', त्याला असे म्हणायचे नव्हते की, स्वच्छ सूर्यप्रकाशांत त्यांना लुटतील.पण फुलनदेवीची गोष्ट तिने वर्तमानपत्रांत वाचली होती. डाकू राणी होती. चंबळ नदीचा या संदर्भांत उल्लेख होता. फक्त ते उड्या मारणाऱ्या माकडांच्या टोळ्यांना सामोरे जात होतो, हा धोका होता. काही वेळा ते थेट त्यांच्या गाडीच्या मार्गांत येत होते.

त्यांचा पहिला मुक्काम कोटाच्या जवळपास बारडोलीचे एका मंदिराशी होता. येथे तिला दहाव्या शतकातील उंटाच्या शिल्पाचा फोटो काढायचा होता. बारडोलीतील उंटाचे शिल्प हे मांजर किंवा लॅपडॉगच्या आकारापेक्षा लहान होते, ज्या स्वर्गीय अप्सरेच्या पायाशी तो बसला होता. हा एक उंट होता पण त्याचे ऐतिहासिक महत्त्व काय होते? दहाव्या शतकात एका मंदिरात उंटाचे चित्रण करण्यात आले होते की त्या काळात हा प्राणी राजस्थानमध्ये ओळखला जात होता आणि वापरला जात होता, की त्यांनी कुठेतरी पाहिलेल्या या आकृतीचे घरगुती चित्रण नुकतेच कॉपी केले होते? प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी तिला ऐतिहासिक वास्तुच्या सार्थपणाची खात्री नव्हती.

त्यांचा शेवटचा मुक्काम होता चित्तोड. राजस्थानच्या इतिहासातील केवळ दोन प्रसिद्ध महिलांची साक्ष देणारा प्रचंड किल्ला. त्यापैकी एक सुंदर पद्मिनी, दुसरी बंडखोर मीराबाई. मीराबाईच्या मंदिराला नक्की भेट द्या, हणमंतने तिच्यावर छाप पाडली, ती माझ्या जातीची आहे.

ती चित्तोड किल्ला तयार करणाऱ्या अनेक इमारती आणि स्थापत्य संकुलांमधून फिरली. तेथे तिला उंटाचा पुतळा सापडला पण तो फक्त सोळाव्या शतकातील आहे. तिला माहीत होते की, राजस्थानमध्ये उंट याच्या आधी पासून वापरात होते. तिने मीराबाईला आदरांजली वाहिली आणि मुस्लीम सरदार अलाउद्दीन खिलजीच्या चाल करून येणाऱ्या सैन्याच्या हाती लागू नये म्हणून ती पद्मिनी आणि इतर ३०० स्त्रियांनी जौहर केला होता त्या ठिकाणी भेट दिली. तिने तलावाच्या मधोमध असलेल्या महिलांच्या वाड्याभोवती फेरफटका मारला. वास्तू मोहक होती, पण ज्या स्त्रिया बंदिस्त होत्या व त्यांना बाहेर जाण्याची संधी नव्हती, ज्यांचे नशीब त्यांच्या पुरुषांच्या परत येण्याची वाट पाहाण्यात होते जे कधी येतील हे माहीत नव्हते.

तिचा राजस्थानमधला मुक्काम व तिची शिष्यवृत्ती संपत आली होती. अचानक राजस्थान सोडून जाण्याच्या कल्पनेने एकदम अनिवार्य निराशेने ती भारावली. अतिशय खोलवर कधीही न अनुभवलेली वेदना तिला जाणवली. एक उत्कट इच्छा, महालांत बंदिस्त असलेल्या राजपुत स्त्रियां सारखी, जिची ती कल्पना करते. तिला त्यांच्या विषयी अनुकंपा वाटते. पण त्यांना कमीतकमी त्यांचे अस्तित्व कुठे आहे हे माहीत असते. येथील जीवनाचा त्या भाग असतात. पण ती विचार करते तिची जागा कुठे होती? ती येथे परत कधी येईल? गोष्टी कशा प्रकारे चालू राहतील? जरी तिने मीराला विकत घेतले

असले व शुल्लक दावा केला असला तरी, ती ग्रामीण भागांत हणमंत बरोबर फक्त फिरणे कायम चालू ठेऊ शकत नव्हती.

ती चित्तोडमध्ये फिरत असते. तिच्या पावलांचा वेग वाढवते व विचार करते, कोणत्या गोष्टीने तिला भारताकडे आणि विशेषतः राजस्थानकडे आकर्षित केले होते? ती जिवंत असण्याची आणि वास्तविक समस्या असलेल्या लोकांमध्ये असण्याची भावना होती का? जी दक्षिण कॅलिफोर्नियाच्या टी. व्ही. मालिकां पद्धतीपेक्षा, जीवनापेक्षा अगदी विरुद्ध होती का? ही हणमंतची निष्ठा होती आणि ती जिथे जाईल तिथे तो तिली सुरक्षित ठेवेल ही भावना होती का? ते काहीही असो वा नसो, तिला तिच्या आणि तिच्या कुटुंबामधील संबंध बिघडत असल्यासारखे वाटले (अडथळा) भावनिकदृष्ट्या नाही, कारण ती त्यांच्यावर पूर्वीसारखे प्रेम करत होती. परंतु स्थानिक आणि गॅरीचे भारतात संशोधन खरोखर सुरू झाले नव्हते आणि तो जॉर्डनमधील त्यांच्या दीर्घकालीन प्रकल्पांकडे परत जाण्यास उत्सुक होता. जॉन आणि आएशा यांना भारतातील अनेक पैलूंनी भुरळ घातली होती. परंतु त्यांचे अनुभव खूपच क्लेशकारक होते. त्यामुळे बाकीचे कुटुंब आनंदाने कॅलिफोर्नियाला परतले होते आणि त्यांना भारतात परत येण्यात फारसा रस नव्हता. तिला वडाच्या झाडासारखे वाटले ज्याच्या पारंब्या नाल्याच्या पलीकडे गेल्या होत्या आणि मूळ खोड उखडून टाकण्याची भीती होती.

त्या रात्री ती झोपतांना रडली आणि जेव्हा ते साद्रीला परतले तेव्हा तिच्यावर नैराश्याचे ढग पसरले. परिसरातील उंटांच्या गर्भपातावर कोणती कारवाई करावी यावर तिने डॉ. देवरामशी सखोल चर्चा केली आणि या निष्कर्षापर्यंत पोहोचले की, ट्रायपॅनोसोमियासिस या रक्ताच्या आजाराने ग्रस्त आहेत. ते त्यांच्या उंटाना रोगप्रतिबंधक विशिष्ट औषधाने उपचार करण्यास उत्सुक होते. तिने आश्वासन दिले की, ती ही औषधे विकत घेण्यासीठी, निधी उभारण्याचा प्रयत्न करेल.

मीराला तपासण्यासाठी त्यांनी अडोजीचा कळप शोधण्याचा प्रयत्न केला. त्यांना शोधण्यात अडचणी आल्या. तिची वेळ संपली आणि हणमंतने तिला विमानतळावर सोडले. त्यांनी हस्तांदोलन केल्यावर, तिला एक भेट दिली - पाबूजी महाकाव्याचा उतारा असलेले एक पुस्तक, ते प्राचीन राजस्थानी साहित्यिक भाषेतील झिंगलमध्ये लिहिलेले होते, त्यामुळे तिला ते वाचता आले नाही, परंतु त्यांच्या विचारांनी ती भारावून गेली.

**- सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पीटल, ठाणे
भ्रमणध्वनी - ९८३३०२९३५६

●●●

(पृष्ठ क्र.४ वरून - **शेक्सपियर वाचनाच्या युक्त्या**)

4. Hast - Have
5. Dost - Do
6. Wilt - Will
7. Ay - Yes.
8. Hark - Listen
9. Alack - Alas!
10. Marry - Indeed/ Truly
11. Prithee - Please
12. Whence - From where
13. Thither - To there
14. Fain - Gladly
15. Zounds! - आश्चर्य दाखवणारी शब्दछटा
16. Fie - नकार दर्शवणारी शब्दछटा

**- डॉ. आशुतोष जावडेकर**
ज्येष्ठ लेखक
पुणे

●●●

# नंदीवर्धन वा नगरधन

*नंदीवर्धन या नागपूर जवळच्या नगरीने चौथ्या आणि पाचव्या शतकात वाकाटकांच्या राजधानी असण्याचा सुवर्णकाळ अनुभवला आहे. हे नांव या नगरीला कसं प्राप्त झालं, त्याचा मागोवा घेत असता समजून येते की सुमारे चौवीसशे- पंचवीसशे वर्षांपूर्वी ते महान मगध साम्राज्याच्या नऊपैकी एका प्रांताचे राजधानीचे शहर होते आणि तेव्हाचे मगध सम्राट महाराज नंदीवर्धन यांच्या आदरापोटी ते त्यांच्या नातवाने या नगरास बहाल केले होते. त्या प्राचीन ते आजतागायत स्थित्यंतरांचा लेखाजोखा प्रस्तुत लेखात घेण्यात आला आहे. - संपादक*



**कोटेश्वरतीर्थ नगरधन**

कथा तशी जुनीच. एक आटपाट नगर होते. हे नगर राजधानीचे शहर म्हणून ओळखले जायचे. दरबारातील मानकरी, अधिकारी, सेनापती, शिपाई, सैनिक, धनाढ्य सावकार, व्यापारी, बारा बलुतेदार, शेतात राबणारे आणि घरी असलेले पशुधन यात रमणारे शेतकरी हे सगळे या नगरीत गुण्यागोविंदाने नांदत होते. गावात सहिष्णू वातावरण होते. घरी असलेल्या पशुधनावर घरातल्या महिला आणि वृद्धांचा हक्क असायचा. त्यामुळे गुरांचे वैरण, त्यांची स्वच्छता, दुधाळ जनावरांचे दूध काढणे हे त्यांनाच बघावे लागायचे. घरात लागणारे दूध सोडून उरलेले दूध गावात विक्रीसाठी नेले जाई. या विक्रीचा भार घरातील सुनांवर असायचा. अशाच एका संपन्न, हसत्या - खेळत्या घरातील सून हे काम मोठ्या आनंदाने करायची. आलेल्या पैशांतून घरासाठी लागणाऱ्या तेल-मिठाची सोय ती परत येताना करायची. न विकलेले दूध ती गावाबाहेर असलेल्या महादेवाच्या पिंडीवर ओतून त्याचा अभिषेक करायची. तिच्या त्या निष्काम भक्तीने भोलेनाथ प्रसन्न झाले. तिची होणारी ओढाताण बघून द्रवले आणि आकाशवाणीच्या माध्यमातून बोलते झाले, 'माई..! उद्यापासून तू घरोघरी जाऊन दूधाची विक्री थांबव. तुझ्याकडे असलेल्या सगळ्या दूधाने तू मला दररोज प्रातःसमयी आंघोळ घालत जा. दुधाच्या मोबदल्याचे द्रव्य तुला पिंडीजवळ दिसेल. ते तू घरी नेत जा.'




**कोटेश्वरतीर्थ नगरधन येथील मंदिरात असलेल्या आख्यायिकेचा फलक**

शिव पावल्याने माई खूश झाली. आता तिचा नित्यक्रम बदलला. घरातील उरलेले दूध घेऊन ती सरळ भोलेनाथांच्या मंदिरात जाऊन त्यांची विधीवत अभिषेक करुन पूजा बांधू लागली आणि पिंडीवर दिसणारे

द्रव्य घेऊन घरी लवकर परतू लागली. 'घंटोका मिनटोंमे' होऊ लागल्याने माईंच्या पतीला वेगळीच शंका येऊ लागली. तो तिच्या मागावर राहू लागला. तेव्हा ती गावात न फिरता सरळ शिवाच्या मंदिरात जात असल्याचे स्पष्ट झाले. मंदिरात अंधार असायचा. त्यामुळे त्याची शंका आणखी बळावली. आता रंगेहाथ पकडायचेच, असे त्याच्या मनात आले. एके दिवशी माई नित्याप्रमाणे मंदिरात जाताच, तिच्या पाठोपाठ तिचा पती चोरपावलांनी मंदिरात प्रवेश करता झाला. अंधारात दिसत नसल्याने माईंच्या पतीला वाटले, ती पूजेच्या बहाण्याने वाईट कामात लिप्त आहे. म्हणून तिला पकडण्यासाठी हात पुढे केला. हातात माईंचे केस आले. हिसका जाणवताच तिने मागे वळून पाहिले. पतीचा तो रुद्रावतार पाहून ती घाबरली आणि भोलेनाथांचा आर्तस्वराने धावा करू लागली. महादेव प्रगट झाले. त्यांनी माईला छातीशी कवटाळले आणि त्रिशूळ पतीच्या मानेवर ठेवत पिंडीत अंतर्धान पावू लागले. पतीला चूक लक्षात आली आणि शिवासोबत अंतर्धान पावणाऱ्या पत्नीसाठी आक्रोश करत तिला स्वतःकडे ओढण्याचा प्रयत्न करू लागला. या झटापटीत त्याच्या हातात तिचे फक्त डोक्याचे केस आले. त्याचे बळ कमी पडले आणि माई शिवांसोबत पिंडीत लुप्त झाली. पती रिकाम्या हाताने घरी परतला आणि झालेली घटना सगळ्यांना कथन करता झाला.

ही कथा बहुश्रुत असून, 'ती इथेच घडलेली आहे', असे छातीठोकपणे सांगणारी अनेक स्थाने भारतात असतीलही, पण दुभंगलेली पिंड आणि त्या पिंडीत हात टाकला तर झाडांची मूळं, स्पर्श होणारं नगरधनचं कोटेश्वर मंदिर एकमेव असावं. त्यातच बाजूलाच वहिवाटीचा रगडा खाऊन झिजलेल्या पायऱ्या असलेली कल्याणी, सनई-चौघडे आणि इतर वादकांच्या बैठकीसाठी मंदिराच्या मुख्य द्वारावर असलेला सज्जा या सर्व बाबी हे कथानक आजचे नगरधन आणि प्राचीन नंदीवर्धन येथेच घडलेले असावे, असे स्पष्टपणे खुणावतांना दिसते. (वादकांच्या बैठकीचा सज्जा आजपासून सुमारे २०/२५ वर्षांपूर्वी सुस्थितीत होता.) कधीकाळी म्हणजे सोळाशे वर्षांपूर्वी या मंदिराने वाकाटकांचे राजमंदिर म्हणून तो सुवर्णकाळ अनुभवला आहे. सध्या ते 'कोटेश्वरतीर्थ' म्हणून ओळखले जाते.

नंदीवर्धन या नगरीबाबत काय बोलावे ? नंदीवर्धन या नावातच प्राचीनत्व आहे. उच्चारात भारदस्तता आहे. या नगरीने पाहिला आहे वाकाटक नृपतींचा संपन्न, समृद्ध सुवर्णकाळ..! तो काळ होता चवथ्या आणि पाचव्या शतकातला.. उज्जैनचे सम्राट विक्रमादित्य यांची सुस्वरूप कन्या प्रभावती आणि विदर्भ नरेश रुद्रसेन द्वितीय, (राज्यकाल - इ.स. ३८० ते ३८५) यांच्या विवाहाचा. त्या निमित्ताने उज्जैन दरबारातील धन्वंतरी, क्षपणक, शंकू, वेताळभट, अमरसिंह घटखर्पर, कालिदास,



नगरधन किल्ला ता. रामटेक, जिल्हा नागपूर जतन पूर्वीचे छायाचित्र



नगरधन किल्ला ता. रामटेक, जिल्हा नागपूर जतन नंतरचे छायाचित्र

वराहमिहीर, वररुची या नवरत्नांचा या परिसराला भेट देण्याचा.. त्यातून येथील संगीत, स्थापत्य, जलसंधारण,

शेती आदींचा स्तर उंचावण्याचा.. आणि विदर्भातील बारूद, शस्त्रे, हिरे, आणि उंची वस्त्रे निर्यात करण्याचा.. तो काळ होता विक्रमादित्य आणि वाकाटकांनी मिळून शक आणि हुणांचा पराभव करण्याचा..!

नंदीवर्धनचे प्राचीनत्व इथेच थांबत नाही, तर ते त्याही आधी शेकडो वर्षांपूर्वी अस्तित्त्वात होते, असे इतिहास सांगतो. त्याचे आधीचे नांव नंदीवर्धनपूर असे होते. नंदीवर्धन हे तसे पुरुषी थाटाचे नांव. त्या अनुषंगाने मागोवा घेतला असता समजून येते की, हे नांव मगध सम्राट नंदीवर्धन यांच्या सन्मानार्थ त्यांच्या नातवाने दिले. सम्राट नंदीवर्धनांच्या आजोबांचे नांव शिशूनाग होते व ते नागवंशीय होते. (इ.पू. ४९२ ते ३९४). त्यांनी वैशाली येथील महाजन पदावरून अठरा वर्षे राज्य करताना अवंती, वत्स आणि अंग हे प्रदेश जिंकून मगध साम्राज्यात विलीन केले. नंदीवर्धनाच्या पित्याचे नांव कालंअशोक तर आईचे नांव कौरीनंदा असे होते. (इ. पू. ३९४ ते ३६६). कौरीनंदा ही पट्टराणी आणि मगध सम्राज्ञी होती. कालंअशोकाने कुरू, पांचाल, मथुरा, मद्र, काशी आणि बंग हा भाग काबीज करून म्हैसूर ते सध्याच्या पाकिस्तानपर्यंत राज्यविस्तार केला आणि आपली राजधानी पाटलीपुत्र (कुसूमपूर) हे नगर पुन्हा सुसज्ज केले. इ.पू. ३६६ मध्ये राजवाड्याच्या अंत:कलहात कालंअशोकाची विषपान करवून विश्वासघातकी हत्या करण्यात आली. त्यानंतर मगध सिंहासनावर नंदीवर्धनाची नेमणूक करण्यात आली. तो एक योग्य शासक असल्याने सर्व प्रदेशांची सुरक्षा आणि प्रशासन संरचना कमी होऊ दिली नाही. त्याने स्वतःला मगध राजवाड्याच्या राजकारणात जातीने लक्ष घालून उर्वरित कामांची जबाबदारी त्याने पुत्र महापद्मानंदावर सोपवली. (इ.पू. ३६६ ते इ.पू. ३३६). महापद्मानंदाच्या काळात पहिले सिमा सुरक्षादल स्थापन करण्यात आले. तसेच प्रसिद्ध नालंदा विद्यापीठाची स्थापनाही केली. या विद्यापीठात व्याकरणाचार्य पाणिनी, कात्यायन, वरुची, वर्ष, उपवर्ष, उपभद्र आणि वांगी यांसारखे बौद्धिक शास्त्रज्ञ, भौतिकतज्ज्ञ आणि खगोल शास्त्रज्ञ कार्यरत होते. महानंदाला ९ पुत्र होते व त्या सर्वांची ९ शासकीय प्रांतांवर मुख्य उपराज म्हणून नेमणूक केली. त्यापैकी विदर्भात पुत्र दाससिद्धक याची या पदावर नियुक्ती केली. त्याच्या अखत्यारीत विंध्याचल ते नांदेड एवढा विस्तीर्ण प्रदेश होता. त्यानेच आत्ताच्या नगरधन नगरीचे नंदीवर्धन असे सुधारित नामकरण आजोबांची आठवण म्हणून केले. काळासोबत प्रवाही होत नंदीवर्धन हे आता नगरधन म्हणून ओळखले जाते. सध्या त्या प्राचीन वास्तूंपैकी फक्त कोटेश्वर तीर्थ आणि किल्ल्यात कांही खुणा शाबूत आहेत. कोटेश्वर तिर्थाची माहिती आधीच आलेली असल्यामुळे आता किल्ल्याबाबत जाणून घेऊ.

हा किल्ला गावाच्या बाहेर असूनसुद्धा दूरवरूनच दिसतो. जवळ जाताच समोर येतं ते भव्य प्रवेशद्वार..! त्याची भव्यता नजरेत न मावणारी..! ती भव्यता आंत जाणाऱ्याला नम्र करते. वर्तमानातून प्राचीनात प्रवेश करतांना ही नम्रता आवश्यक आहे. कारण.. प्रवेशद्वारातून किल्ल्यात सरळ प्रवेश नाही. आत जाताच देवड्या दिसतात. तिथून डावीकडे वळल्यावर प्रवेशाचं दुसरं द्वार येतं आणि समोर दिसू लागतात त्या..आधुनिक, रघुजी राजे- प्रथम, गोंड नृपती, यादव आणि वाकाटक आदी साम्राज्यांच्या वहिवाटींच्या खाणाखुणा ..! सभोवताली नजर टाकली की उंच तटबंदी व त्यावर जाण्यासाठी आतून जिने, पायऱ्या आणि कमानीद्वारं दिसतात. मधलं पटांगण म्हणजे प्राचीन काळातील फरसबंदीचे रस्ते आणि कधीकाळी असलेल्या इमारतींचे चौथरे यांनी व्यापलेला भाग. हा भाग तेव्हा चौक, कारंजे, दिवाणखाणे, कचेऱ्या, वाडे, राजवाडे आणि इतर वास्तूंनी व्यापलेला असेल. मात्र, निर्माणकाळी चौथऱ्यांची आखलेली लय न मोडणारे अवशेष त्या काळच्या


वास्तूंबाबत काहीतरी नक्कीच सुचवत असतात आणि त्यातूनच आपणास ते समजून घ्यावे लागते.




**नंदीवर्धन (नगरधन) येथील किल्ला**

आत फिरतांना एक नक्षीवंत बहुमजली विहीर दिसते. ती गोंडनृपतींच्या स्थापत्यशैलीची सारी वैशिष्ट्ये आणि सौंदर्ये एकवटून आहे. भूमीच्या गर्भाला जिव्हाळा म्हणजे पाण्यापर्यंत पोहोचण्यासाठी बांधलेल्या पायऱ्या खोल - खोल जातांना त्या पाण्याची गुढता सांगत असल्याचा भास होत असतो. जेवढं दिसतं आणि जाणवतं त्यापेक्षा कितीतरी जास्त आंत असलेलं हे बांधकाम उन्हाच्या प्रहरी विसाव्याच्या अंधाऱ्या एकांत असलेल्या जागेपर्यंत जावूनच विसावतं. त्यामुळे किल्ल्याचं जुनं सौंदर्य आजतागायत सांगणारं हे एकमेव स्थान आजही सुव्यवस्थित आहे.

एका जागी बारीक विटांच्या बांधकामांचे अवशेष आढळतात. हे अवशेष भोवतालच्या सिमेंट आणि त्या खालच्या दगडांच्या आधीचे आहेत, हे एका क्षणात जाणवतात. या परिसरातील हे आदिम आहेत. एक मोठी जबाबदारी या दोन-चार विटांनी सांभाळली आहे. आजूबाजूला रचलेल्या वर्तमानाच्या पार्श्वभूमीवर या विटांचे गळून जात असलेले आयुष्य हीच या किल्ल्याच्या जिव्हारी लागलेली जखम आहे. हे अवशेष थोड्याच दिवसांसाठी आहेत, हे जणू या परिसराला समजलं असावं. त्यांच्यानंतर सगळा परिसर निर्जीव




होईल आणि आत्ताचा सिमेंटचा किल्ला त्या प्राचीन किल्ल्याचं स्मारक म्हणून जगू लागेल. त्या अवशेषांचा मृत्यू लांबत आहे. तेव्हढीच एक खूण आणि साक्ष त्या प्राचीन नंदीवर्धनाची आज उभी आहे.


असो, आज जो किल्ला दिसतो तो प्राचीन असला तरी मूळ किल्ल्यासाठी तो वर्तमान आहे. चवथ्या/पाचव्या शतकात निर्मिलेल्या अवशेषांवरच आजचा किल्ला उभा आहे. गोडनृपतींच्या काळात ही नवनिर्मिती झाली. त्यानंतरही त्यात अनेक बांधकामे, डागडुजी करण्यात आली. आज किल्ला सिमेंटचे प्लॅस्टर लेवून उभा आहे. मात्र, ज्यांनी ही स्थित्यंतरे बघितली,ते प्राचीन अवशेष किल्ल्यातच एका जागी निरुपायपणे उभी आहेत.

या किल्ल्यात प्रभावती गुप्ताचा (राज्यकाल - इ.स. ३८५ ते ४०५) मिळाला आहे. तिचा मुलगा द्वितीय प्रवरसेन याने याच ठिकाणाहून दिलेला ताम्रपट

(पृष्ठ क्र. १८ वर)

# कुंभमेळा - हिंदू अर्थव्यवस्थेचा अविभाज्य घटक

*नुकत्याच प्रयागराज येथे सुरू झालेल्या कुंभमेळ्याच्या आर्थिक बाजूंवर प्रकाश टाकणारा लेख - संपादक*




नद्यांच्या तिरांवर विकसित झालेली, शेतीप्रधान अशी भारतीय संस्कृती आहे. अन्न वस्त्र निवारा यांची ददात नसल्यामुळे इथे सांस्कृतिक, आध्यात्मिक, शास्त्र, भाषा, गणित, आयुर्वेद, शिल्पकला, स्थापत्य, रसायन, विविध कला, वाणिज्य, अशा कित्येक विषयांत भारतीय उपखंडात प्रचंड काम गेली हजारो वर्षे होत आहे. या सगळ्याला मंदिर अर्थव्यवस्थेने एक कोंदण दिले. यातून जागोजागी प्रस्थपित झालेले ज्ञान, संशोधन जगभरात पसरविण्यासाठी कुंभमेळा व्यवस्था अस्तित्वात आली. Sustainability हा सनातन संस्कृतीचा मूळ आधार आहे. या तत्त्वाला अनुसरून दर सहा वर्षांनी येणाऱ्या कुंभमेळ्याचा फायदा भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक चक्रे वेगाने फिरवण्यासाठी, मंदी येऊ घातली असेल तर ती मोडून काढण्यासाठी होत राहिला. इतकेच नाही तर, कुंभमेळा ही इथल्या अर्थव्यवस्थेला नवनव्या उंचीवर पोहोचवणारी यंत्रणा बनली. भारतीय खंडात सोन्याचा धूर निघू लागला.

हजारो वर्षे चालत असणारी ही व्यवस्था केवळ अपघाताने हिंदू असणाऱ्या व्यक्ती पंतप्रधान पदावर बसू लागल्याने मोडीत काढण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. हिंदूंना हिंदू असण्याची लाज वाटावी, हिंदुपणाच्या सर्व निशाण्या त्यांनी सोडून द्याव्यात, यासाठी जोरदार प्रयत्न झाले. परंतु आता संधी मिळताच आपल्या उदार, समृद्ध परंपरेला धरून काळाच्या प्रवाहात उमटलेला हा केवळ एक ओरखडा आहे, असे समजून भारतीय अर्थव्यवस्था नव्याने आपल्या मूळ स्वरूपात, रसरशीत, सुंदर तरुणी सारखी बहरून येऊ लागली आहे. आजपासून सुरू झालेला हा कुंभमेळा आता 'महाकुंभ मेळा' झाला आहे.

२०१३ साली कुंभमेळ्यात १२ हजार करोड रुपयांचे आर्थिक व्यवहार संपन्न झाले होते. सहा लाख लोकांना रोजगार मिळाला होता. पुढे २०१९ मध्ये इथे अर्धकुंभ संपन्न झाला, त्यातही सरकारने ४ हजार करोड रुपयांची गुंतवणूक केली होती. त्यातून १.२ लाख करोड रुपयांच्या संपत्तीचे निर्माण केले गेले. केवळ या दोन आकड्यांवरून आपल्याला या दर सहा वर्षांनी येणाऱ्या कुंभांचे महत्त्व आणि अर्थव्यवस्थेला नव्या उंचीवर पोहचवण्याची त्यांची क्षमता याचा अंदाज सहज येऊ शकेल. ही हिंदू समाजाने भारतीय उपखंडाच्या आध्यात्मिक, सामाजिक, राजकीय, शास्त्रीय, आर्थिक, उत्थानासाठी निर्माण केलेली हजारो वर्षांपासून सुरू असणारी व्यवस्था आहे. आर्थिक मंदीचा फटका टाळण्यासाठी कायमच भारताला कुंभमेळ्यांनी हात दिला आहे.

यावर्षीचा हा मेळा अर्धकुंभ किंवा दर १२ वर्षांनी येणारा कुंभमेळा नाही तर यावेळचा कुंभ हा 'महाकुंभ मेळा' असणार आहे. कारण महाकुंभ भरविण्यासाठी

जी आकाशिक ग्रहाताऱ्यांची स्थिती दर १४४ वर्षांनी एकदा येते, तशी astronomical constellations या वर्षी आली आहेत. इतकेच नव्हे तर, पृथ्वीतलावर इतकी प्रचंड मानव संख्या म्हणजे ८.२ billion लोक known मानवी इतिहासात प्रथमच पाहायला मिळत आहे.

या सगळ्याचा एकत्रित परिपाक म्हणून यावर्षी ४० ते ४५ कोटी लोक आस्थेने त्रिवेणी संगमावर स्नान करायला येणार असा अंदाज आहे. आज भारताच्या एकूण जीडीपी पैकी २.५ ते ३ टक्के उत्पन्न मंदिरे आणि त्यांच्याशी निगडित व्यवसायांद्वारे भारताला मिळते. याचाच अर्थ इतके लोकं विविध प्रकारे मंदिरे, देव, श्रध्दा इत्यादी संकल्पनांशी जोडलेले आहेत. आणि म्हणूनच त्यादृष्टीने राज्य आणि केंद्र सरकारनेही सर्व तयारीला सुरुवात केली आहे. यासाठी सुरू असलेल्या व्यवस्था आणि आर्थिक गणिताचा आता विचार करू.

आता देशाच्या तृतीयांश लोकसंख्येला म्हणजे ४० कोटी लोकांना दीड महिन्यासाठी का होईना, पण प्रयागराजमध्ये राहणारी १७ लाखाची लोकसंख्या तर cater करूच शकत नाही ना.. म्हणजे या होऊ घातलेल्या जगातल्या सर्वांत मोठ्या मानवी एकत्रीकरणासाठी भारतभरातील लोकांना प्रचंड प्रमाणात रोजगार मिळाला आहे. गेल्या कुंभाच्या तिप्पट म्हणजे २४०० हेक्टर जागा सरकारने कुंभासाठी आबंटीत केली आहे. सात हजार नव्या इलेक्ट्रिक बसेस उत्तरप्रदेशच्या रस्त्यांवर उतरत आहेत. १३००० नव्या trains भारतभरातून प्रयागराजकडे यायला निघाल्या आहेत. नवे रस्ते, पूल, रेल्वे रूळ, स्टेशन्सचे निर्माण केले जात आहे. लोकांना राहणे, खाणे, पिणे, फिरणे, खरेद्या, धार्मिक कार्ये करता यावीत म्हणून प्रचंड व्यवस्थापन कामाला लागले आहे. नव्या प्रकारच्या स्वच्छता व्यवस्था शहरभर जोडून दिल्या जात आहेत. कमीतकमी १० हजार सरकारी स्वच्छता मित्र यात आले आहेत. लोकांच्या सुविधेसाठी १.५ लाख स्वच्छतागृहे जागोजागी उभी केली गेली आहेत. २०,००० तर केवळ नव्या कचरापेटी ठेवल्या गेल्या आहेत. २५ लाख गाड्यांच्या पार्किंगची व्यवस्था केली गेली आहे. सरकारने उभ्या केलेल्या या व्यवस्था केवळ कुंभकाळासाठी नसून येणाऱ्या मोठ्या काळासाठी उपयोगी ठरणार आहेत.

सुरक्षा यंत्रणा सुद्धा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बसवण्यात आल्या आहेत. २३हजार CCTV कॅमेरा बसवले गेले आहेत. ड्रोन्स, AI सेर्व्हलियन्स विडिओ आणि Thermal imaging system अशा सर्व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा यासाठी खूपच उत्तम उपयोग करून घेतला जातो आहे.

आध्यात्मिक टुरिझम हा एक अत्यंत सफल असा व्यवसाय भारतात मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ घातला आहे. सरकारी अंदाजानुसार केवळ एका अयोध्येच्या राम मंदिरातच दर वर्षी कमीत कमी ५ कोटी लोक दर्शनाला येतील असा अंदाज होता. परंतु पहिल्या सात महिन्यांतच भाविकांनी १२ कोटींचा आकडा पार केला. जगातल्या दोन नंबरची लोकसंख्या असणाऱ्या इस्लामच्या हज यात्रेला वर्षाला २ कोटी लोक जातात. यावरून हे आकडे किती महाकाय आहेत याचा अंदाज बांधता येऊ शकेल.

आणि भारतात अशी कित्येक आध्यात्मिक श्रद्धास्थाने, शक्तिपीठे आहेत. आजमितीला २००-२५० मोठी भारतीय शहरे त्या शहरातील देवालयामुळे आर्थिकदृष्टचा सशक्त आहेत. तिरुपती बालाजी देवस्थानची वार्षिक आर्थिक उलाढाल ३००० करोड रुपयांची आहे. आपले महाराष्ट्रातले शिर्डी देवस्थान कमीतकमी ५०० कोटींची उलाढाल करीत असते.

गेल्या कुंभमेळ्यासाठी सरकारने ४००० करोडची गुंतवणूक केली. सामान्य अंदाजानुसार त्याद्वारे कुंभ काळात १ लाख करोड रुपयांची अर्थव्यवस्था उभी राहिली. आता या महाकुंभासाठी राज्य आणि केंद्र

सरकारांनी मिळून जवळपास २५ हजार करोड रुपयांची गुंतवणूक infrastructure development आणि इतर सुविधा निर्माणासाठी म्हणून केली आहे. GST, Rentels, वेगवेगळे Jio Service charges, licensing permissions, tourism इत्यादीतून यावेळी २ ते अडीच लाख करोड रुपयांची संपत्ती निर्माण केले जाईल असा अंदाज वर्तवण्यात येतो आहे.

स्वामी विवेकानंदानी शिकागोमध्ये जी हिंदू धर्माची छोटीशी ज्योत लावली होती, त्या ज्योतीचा प्रकाश आता जगभरातील करोडो मनांना तेजाळून टाकतो आहे. हिंदू आध्यात्मिक ज्ञानाची ओढ लागलेले लाखो परदेशी जीव या कुंभमेळ्यात डुबकी मारण्यासाठी येत आहेत. त्याद्वारे जवळपास २.२ बिलियन डॉलर्सचा revenue सरकारी खात्यात जमा होणार आहे.

अनेक छोट्यामोठ्या FMCG, फार्मा, एती, दुचाकीपासून सर्व गाड्यांच्या कंपन्या UPI, banks, mobile अशा कित्येक कंपन्यांनी स्पॉन्सरशिप घेतली आहे. त्यांच्या वस्तूंची जाहिरात आणि विक्रीही या कुंभमेळ्यात मोठ्या प्रमाणावर होईल. केवळ ब्रँडिंगसाठी कंपन्यांनी ३ हजार करोड खर्च केला आहे. लोकांना राहण्यासाठी हॉटेल, टेन्ट्स, आणि इतर मार्गाने सुविधा तयार केल्या गेल्या आहेत. टूर कंपन्या चांगल्याच तेजीत आल्या आहेत. मेळ्याला आलेले लोक अयोध्या, काशी, वृंदावन वगैरे आसपासच्या बहुतांश छोट्या मोठ्या धार्मिक स्थळांना भेटी देणार हे उघड आहे. त्यामुळे तिथल्या अर्थव्यवस्थानाही मजबुती मिळणार आहे.

ही सगळी तर actual आकडेवारी झाली. पण भारतीय सनातन धर्माचा दबदबा, इथल्या समाजाची सर्व प्रकारची ताकद या निमित्ताने सिद्ध होते आहे. स्पेनच्या टोमॅटिना उत्सवात टोमॅटोचा चिखल पाहायचे आकर्षण असणारे पण 'कुंभमेला म्हटलं की मुले हरवायची जागा' असे कुत्सितपणे बोलून नाके मुरडणारे लोकही आपली मते बदलू लागले आहेत. भारतीय समाजात हिंदुपणाच्या शक्तीचा जागर या निमित्ताने होतो आहे. केवळ भारतीयच नाही तर सारे जगच 'वसुधैव कुटुंबकम' या उक्तीनुसार सर्वशक्तिमान परमेश्वराच्या या भव्य दिव्य महाआरतीला प्रयागराजकडे प्रस्थान करू लागले आहे. या गोष्टींना कसलेही मोल लावता येणे शक्य नाही. भारताच्या इतिहासात हा महाकुंभ मेळा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

**– अमिता आपटे**
अर्थकारणाच्या अभ्यासिका
खारघर

●●●

---

(पृष्ठ क्र.१५ वरून – **नंदीवर्धन वा नगरधन**)

उपलब्ध आहे. नलवंशीय राजा भवदत्त वर्मा याने वाकाटकांचा पराभव केल्यानंतर इथूनच दिलेला ताम्रपट अमरावती जिल्ह्यातील ऋद्धिपूर येथे सापडला. भोसले काळात तर रामटेकपेक्षा या किल्ल्याला महत्त्वाचे स्थान होते. २०१५– २०१६ च्या दरम्यान या परिसरात डेक्कन कॉलेज, पुणेच्या डॉ. श्रीकांत गणवीर, विराग सोनटक्के आणि शंतनु वैद्य यांनी उत्खनन केले असता त्यांना ताम्रपाषाणयुगीन अवशेष आणि एल्यूशियन हत्यारे प्राप्त झालीत. त्यामुळे हे स्थान प्रागैतिहासिक काळातील पुरातत्वीय असल्याचे वास्तव जगापुढे आले.

आजच्या घडीला मात्र दुखावलेला जीव, जिव्हारी लागलेली कुठलिशी जखम उराशी घेऊन हे प्राचीन नंदीवर्धन व आत्ताचे नगरधन कसेबसे उभे आहे.

**– दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर – ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ–मेल– wandalkardilipgmail.com

●●●

---

''वारसा हा वस्तूंचा नसतो. विचारांचा असतो.''

# संतसाहित्य जगणारे ह.भ.प. किसन महाराज साखरे

*संत साहित्याचे अभ्यासक आणि वारकरी संप्रदायाचे ज्येष्ठ कीर्तनकार डॉ. किसन महाराज साखरे (वय ८९) यांचे सोमवारी दिनांक २० जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतींना वंदन करणारा लेख – संपादक*

गुरुवर्य किसन महाराज साखरे म्हणजे वारकरी संप्रदायातील एक महान व्यक्तिमत्त्व. महाराष्ट्रभर सुपरिचित असलेल्या साखरे सांप्रदायिक सार्थ ज्ञानेश्वरीचे कर्ते म्हणून त्यांचा लौकिक सर्वदूर आहे. ज्ञानेश्वरीमधील ओव्यांचे अत्यंत तत्त्वदर्शी व रसाळ, तसेच प्रासादिक भाष्य प्रसिद्ध करून त्यांनी मराठी वाङ्मयाची मोठी सेवा केली आहे.

ह.भ.प. श्री किसन महाराज साखरे वारकरी कीर्तनकार, प्रवचनकार, संत वाङ्मयाचे प्रचारक, अभ्यासक, तत्त्वचिंतक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म लातूर जिल्ह्यातील पान चिंचोली येथे झाला. त्यांचे वडील परमगुरू दादा महाराज साखरे, आजोबा नाना महाराज साखरे हे संत साहित्याचे अभ्यासक होते. वेद, उपनिषदे, गीता, भागवत, ज्ञानेश्वरी, सकल संतगाथेचे अध्ययन आणि अध्यापन साखरे घराण्यात सुरू होते. त्यामुळे कोणतेही औपचारिक शिक्षण न घेता बालवयात किसन महाराजांना संत साहित्याच्या अध्ययन, अध्यापनाचे संस्कार लाभले. नाना महाराज साखरे यांनी ज्ञानेश्वरीचे आणि अन्य संत वाङ्मयाचे संपादन केले.



अध्यात्म आणि तत्त्वज्ञान यांचे चिंतन ही किसन महाराजांची केवळ जीवननिष्ठा नव्हे, तर परमश्रद्धा बनली. पुणे जिल्ह्यातील आळंदी येथील साधकाश्रमात गुरू-शिष्य परंपरेचा अंगीकार करून साखरे महाराज यांनी संत साहित्य, तत्त्वज्ञान, व्याकरणशास्त्र याचे अध्ययन केले. प्रख्यात तत्त्वज्ञ एन. पी. मोडक यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे शिक्षण घेतले. १९६० मध्ये साधकाश्रमाची धुरा किसन महाराजांच्या हाती आली. तेव्हापासून निःस्वार्थीपणे कुठल्याही जातीपातींचा अडसर न ठेवता साधकाश्रमात ज्ञानार्जनासाठी आलेल्या अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी संत साहित्य आणि तत्त्वज्ञानाचे शिक्षण दिले. कीर्तन, प्रवचनाद्वारे महाराष्ट्राच्या खेडोपाड्यांतून त्यांनी आध्यात्मिक प्रबोधन अनेक वर्षे घडविले. कीर्तन, प्रवचन करणारे हजारो विद्यार्थी त्यांनी घडविले. मूल्याधिष्ठित शिक्षण प्रणालीचा ध्यास साखरे महाराजांनी घेतलेला असल्याने मोफत बाल संस्कार शिबिरांची संकल्पना त्यांनी प्रत्यक्ष यशस्वीरीत्या राबविली. श्रीमद्भगवतगीता आणि ज्ञानेश्वरीच्या प्रचार, प्रसारासाठी त्यांनी महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेर वाराणसी, वृंदावन, रामेश्वर आदी ठिकाणी 'गीता ज्ञानेश्वरी ज्ञानयज्ञा'चे आयोजन अनेकवेळा केले. संत साहित्य आणि तत्त्वज्ञानाच्या प्रचार, प्रसारासाठी आधुनिक तंत्रज्ञान अतिशय गरजेचे आहे हे लक्षात घेऊन त्यांनी सी. डी. ए. सी. म्हणजे प्रगत संगणक अध्ययन केंद्राचा प्रारंभ केला. अनेक पदवीधर विद्यार्थ्यांना संगणक शास्त्रात शिक्षण देण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. अध्यात्म क्षेत्रातील त्यांचे भरीव योगदान लक्षात घेऊन सावित्रीबाई

फुले-पुणे विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज-नागपूर विद्यापीठ, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक आदी विद्यापीठांत त्यांनी मार्गदर्शक म्हणून काम केले. विविध विद्यापीठांमध्ये पीएच.डी. आणि डी.लिट पदवीच्या परीक्षक मंडळावर सदस्य म्हणून साखरे महाराज यांनी काम केले होते. आकाशवाणी केंद्रावरून आयोजित होणाऱ्या कीर्तन स्पर्धांचे परीक्षक म्हणूनही त्यांनी जबाबदारी स्वीकारली. गेली ४५ वर्षे 'स्वस्तिश्री' या मासिकाचे संपादन ते करीत होते. बुलडाणा जिल्ह्यातील हिवरा येथे आयोजित झालेल्या अखिल भारतीय कीर्तनकार संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. ज्ञानेश्वरी वाचन मंदिर, रंगनाथ महाराज चॅरिटेबल ट्रस्ट अशा संस्थांचे विश्वस्तपद त्यांनी भूषविले आहे. कीर्तन प्रवचनातून आध्यात्मिक प्रबोधन करतानाच हजारो लोकांना व्यसनमुक्त करण्याचे सामाजिक कार्य त्यांनी केले. 'श्री क्षेत्र आळंदीच्या ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे' विश्वस्त म्हणूनही त्यांनी जबाबदारी स्वीकारली होती. 'श्री क्षेत्र आळंदी देहू परिसर विकास समिती'च्या सुकाणू समितीचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. ग्रंथराज ज्ञानेश्वरीची दृकश्राव्य प्रत त्यांनी प्रकाशित केली आहे. किसन महाराजांनी संस्कृत आणि मराठीतून एकूण ११५ ग्रंथ लिहिले आहेत. सार्थ ज्ञानेश्वरी, सार्थ एकनाथी भागवत, सार्थ तुकाराम महाराज गाथा, सार्थ भगवद्गीता, सार्थ ब्रह्मसूत्र, सार्थ उपनिषद, सोहम योग, ज्ञानेश्वर महाराज चरित्र आदी ग्रंथसंपदा त्यांच्या लेखणीतून साकार झाली. एकूण ५०० ताम्रपटांवर त्यांनी ज्ञानेश्वरी प्रकाशित केली आहे. साखरे महाराज यांना महाराष्ट्र सरकारतर्फे २०१८ मध्ये 'ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार' प्रदान करण्यात आला. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने डी. लिट या सर्वोच्च पदवीने त्यांना सन्मानित केले होते.

**- डॉ. प्रशांत धर्माधिकारी**
गुजरात केंद्रीय विश्वविद्यालय, वडोदरा
भ्रमणध्वनी : ९४२२४९५०९४

(मुखपृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | ०२ | ७३ | ५०० |
| ५०१ | ७२ | ०५ | १६ |
| ०३ | १८ | ४९९ | ७४ |
| ७१ | ५०२ | १७ | ०४ |

या जादुच्या चौरसात ५९४ ही बेरीज तब्बल २२ वेगवेगळ्या पद्धतींनी मिळवता येते. त्या चौरसातील पहिली ओळीत १९ २ ७३ ५०० या संख्या म्हणजे कोपर्निकसची जन्मतारीख आणि त्यांनी साजरी केलेली ५०० वी जयंती हा आकडा.

रँग्लर परांजपे हे कापरेकर यांचे फर्ग्युसन कॉलेजातील प्राध्यापक होते. त्यांच्या शहाऐंशीव्या जन्मदिवसानिमित्त (१६-२-६२) कापरेकर यांनी त्यांच्या गुरूंसाठी तब्बल पाच संख्यांचा चौरस बनवला होता.


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | ०२ | १९ | ६२ | ८६ |
| ०१ | ६७ | ९१ | २१ | ०७ |
| ९६ | २६ | १२ | ०४ | ४७ |
| १७ | ०९ | ५२ | ७६ | ३१ |
| ५७ | ८१ | ११ | २२ | १४ |

१९८६ मध्ये वयाच्या ८१ व्या वर्षी कापरेकर सरांनी या जगाचा निरोप घेतला. जग सोडून जाण्यापूर्वी त्यांनी प्रचंड अशी गणित संपदा आपल्यासाठी सोडलेली आहे. तसेच, गणित मनोरंजक करण्याचा मार्ग त्यांनी आपल्याला दाखविला आहे. गणित हा बऱ्याच विद्यार्थ्यांना न आवडणारा विषय असतो. त्यांना गणिताची गोडी लावण्यासाठी कापरेकर सरांचे कार्य उपयोगी पडणारे आहे असे मला वाटते. म्हणूनच त्यांचे कार्य समजून घेऊन ते शाळकरी मुलांपर्यंत पोहोचविण्याचा शिक्षकांनी प्रयत्न करावा असे मी आवाहन करू इच्छितो.

**- डॉ. सुधाकर आगरकर**

# ब्रिटनच्या डोळ्यांत इस्लाम 'प्रेमा' चं झणझणीत अंजन घालणारा डग्लस मरे

*प्रस्तुत लेखात डग्लस मरे (Douglas Murray) या ब्रिटिश लेखकाचं 'द ट्रेंज डेथ ऑफ युरोप' (The Strange Death of Europe) या पुस्तकावर तसेच त्या अनुषंगाने अन्य बाबीवर श्री. हेरंब ओक यांनी भाष्य केले आहे – संपादक*





गेल्या आठवड्यात डग्लस मरे (Douglas Murray) या ब्रिटिश लेखकाचं 'द स्ट्रेंज डेथ ऑफ युरोप' (The Strange Death of Europe) हे पुस्तक वाचायला सुरुवात केली. गेले अनेक महिने वाचायचं म्हणत होतो, पण काही ना काही कारणांनी राहून जात होतं. आत्ताही राहूनच गेलं. पण वेगळ्या कारणामुळे. खुद्द डग्लस मरेच्याच दुसऱ्या एका पुस्तकामुळे. 'स्ट्रेंज डेथ ऑफ युरोप' वाचत असताना नेटवर डग्लस मरेच्याच 'इस्लामोफिलिया' (Islamophilia) या विचित्र नावाच्या पुस्तकाने लक्ष वेधून घेतलं. 'इस्लामोफिलिया' चाळत असताना ते एवढं आवडलं की, आधी तेच संपवायचं ठरवलं.

जगभरातली डापु मीडिया, तथाकथित 'Internet Intellectuals', हॉलिवूड इत्यादींच्या कृपेने आपण 'इस्लामोफोबिया' या शब्दाशी एव्हाना परिचित झालेलो असतो. पण हे इस्लाम बद्दलचं फिलिया हा काय प्रकार आहे हे मला कळेना. फिलिया म्हणजे आवड. पुस्तकप्रेमींसाठी वापरली जाणारी संज्ञा म्हणजे bibliophile, किंवा लहान मुलांची 'आवड' असणाऱ्या आणि त्यांच्याकडे आकर्षित होणाऱ्या प्रौढ लोकांसाठी वापरली जाणारी paedophile ही संज्ञा ही याची काही उदाहरणं.


'इस्लामोफिलिया' हे अगदी छोटंसं पुस्तक आहे. जेमतेम ७५-८० पानी. त्यात डग्लस मरे आपल्याला आधी इस्लामोफोबिया या शब्दाचा अर्थ थोडक्यात समजावून सांगतो. 'आधुनिक जगातल्या वैचारिक स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य इत्यादी मूलभूत तत्त्वांना नाकारणाऱ्या सातव्या शतकातल्या इस्लामी (अ)विचारधारेला विरोध करणारे संतुलित विचारांचे लोक म्हणजे इस्लामोफोब' ही साधीसोपी जगन्मान्य व्याख्या. आता पुढे जाऊन मरे म्हणतो की, 'तुम्ही आम्ही सर्वच जण इस्लामोफोब आहोत. आपण एखादं 'चुकीचं' (अर्थात इस्लामच्या दृष्टीने चुकीचं) नाटक अर्थात वोल्टायरचं मुहंमद पैगंबरांच्या आयुष्यावर बेतलेलं 'महोमत' (Mahomet) नावाचं नाटक बघितलं किंवा सलमान रश्दीलिखित 'The Satanic Verses' सारखं एखादं 'चुकीचं' पुस्तक वाचलं की आपण लगेचच इस्लामोफोब ठरतो.'

इस्लामोफोब हा शब्द युरोपात (किंबहुना जगभरातच) गेल्या काही दशकांत शिवीसारखा वापरला जायला लागलेला आहे. एखाद्यावर 'इस्लामोफोब' असण्याचा आरोप ठेवला गेला की, त्याचं सामाजिक जीवन नकोसं करून ठेवलं जातं, त्याला त्याच्या सार्वजनिक जीवनात असंख्य अडचणींना तोंड द्यावं लागतं. त्यामुळेच आपल्यावर इस्लामोफोब हा शिक्का




बसू नये यासाठी कुठलाही नागरिक इस्लामविषयी मत व्यक्त करताना अतिशय काळजीपूर्वक आणि सुरक्षित अशी भूमिका घ्यायला लागतो. इस्लाम, त्यातल्या कुप्रथा इत्यादींवर टीका न करता तो त्यांच्या धर्माचा अंतर्गत मामला आहे असं म्हणून सोडून द्यायला लागतो. आणि या सगळ्या गोष्टी ब्रिटनमधले सरकारी वकील असोत, की न्यायाधीश, कलाकार असोत, की पॉपस्टार्स, मंत्री असोत, की दस्तुरखुद्द पंतप्रधान, एवढंच कशाला खुद्द ब्रिटिश राजघराणं, प्रिन्स-बीन्स ते अगदी थेट पोप महाशय असल्या सगळ्यांकडून अगदी कसोशीने पालन केल्या जातात, अंगिकारल्या जातात. काहीही झालं तरी आपल्यावर 'इस्लामोफोब' असण्याचा शिक्का बसू नये याचा यातला प्रत्येकजण कसोशीने प्रयत्न करत असतो. आपली छबी कुठूनही, चुकूनही इस्लामोफोब वाटू नये यासाठी ते पराकोटीच्या कसरती करत राहतात!

इंग्लंडमधलं ग्रुमिंग/रेपिंग गँग्जचं कुप्रसिद्ध प्रकरण हा याचाच दुर्दैवी परिपाक आहे. गेल्या २५-३० वर्षांत इंग्लंडमधल्या १०-१५ वर्षं वयोगटातल्या किमान वीस हजार ते पाच/दहा लाख गौरवर्णीय ब्रिटिश मुलींवर ३० ते ६० वयोगटातल्या पाकिस्तानी पुरुषांनी अपहरण, डांबून ठेवणे, हत्या, शारीरिक अत्याचार, बलात्कार, सामूहिक बलात्कार अशा प्रकारचे हजारो गुन्हे केलेले आहेत. निष्पाप मुलींना हेरून, त्यांच्याशी ओळख वाढवून, त्यांच्यावर भेटवस्तूंचा वर्षाव करून, त्यांच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित करणे ही पहिली पायरी, त्यानंतर त्या मुलींना त्यांच्या ओळखीच्या अन्य मुली, मैत्रिणी, बहिणी इत्यादींना घेऊन




येण्यासाठी भाग पडणे, व्हिडीओ दाखवून ब्लॅकमेल करणे, मादक पदार्थांचा वापर करून त्यांना आपल्या कह्यात घेणे ही दुसरी पायरी आणि त्यानंतर या मुली आपापल्या ओळखीच्या अन्य गटांमध्ये अक्षरशः वाटणे किंवा फिरवणे आणि हे चक्र असंच चालू ठेवणे ही तिसरी पायरी. (अगदी याचप्रकारे इस्लाममध्ये गुलाम स्त्रियांचा व्यापार होत असे, युद्धात सापडलेल्या कैदी स्त्रियांचं वाटप होत असे. ही पद्धत इस्लामच्या सुरुवातीच्या काळापासून ते थेट अगदी अलीकडे आयसिसने यझिदी स्त्रियांना गुलाम बनवण्यापर्यंत वापरण्यात येत होती. नादिया मुरादच्या 'द लास्ट गर्ल' या सत्यकथेत याचे भयावह उल्लेख आहेत.)

(या अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाच्या प्रकरणांवर ब्रिटनमध्ये अनेक पुस्तकं लिहिली गेली आहेत, अनेक चित्रपट आणि माहितीपट प्रदर्शित करण्यात आले आहेत.

पुस्तकं

Just a Child: Sammy Woodhouse
Broken and Betrayed: Jayne Senior
Pimped : Samantha Owens
Girl for Sale: Lara McDonnell
Three Girls (मिनिसिरीज)
Betrayed Girls (माहितीपट)

त्यानंतर लेखक अमेरिकेतल्या इस्लामोफोबिया-विषयीशी भाष्य करतो. त्यात जॉर्ज बुशवर चांगलेच कोरडे ओढलेले आहेत. ९/११ च्या भयंकर हल्ल्यांनंतर काही दिवसांतच तत्कालीन राष्ट्राध्यक्ष असलेल्या बुशने वॉशिंग्टन इथल्या एका इस्लामी केंद्रात कुराणाचं इंग्रजी भाषांतर हे मूळ अरबी कुराणाशी कसं अप्रामाणिक आहे या विषयावर भाषण ठोकलं होतं.

त्यानंतर पुस्तकात बराक ओबामा, हिलरी क्लिंटन आणि सीआयए डायरेक्टर जॉन ब्रेननच्या इस्लामप्रेमाचे काही प्रसंग नमूद करण्यात आले आहेत. ब्रेनन हा सुरुवातीला अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या दहशतवादविरोधी सल्लागार समितीतील एक सामान्य अधिकारी होता जो काही वर्षांतच सीआयए डायरेक्टरच्या खुर्चीवर जाऊन बसला!

हे लोण हळूहळू अमेरिकन सैन्यदलातही जाऊन पोचल्याचं लेखक नमूद करतो. अफगाणिस्तान युद्धादरम्यान कुराणाचा अपमान केल्याबद्दल एका ज्येष्ठ सेनाधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आल्याचं एक उदाहरण वाचून वाचक थक्क होऊन जातो! २००९ मध्ये फोर्ट हूड, टेक्सस मधल्या सैन्यतळावर असताना निदाल हसन नावाचा अमेरिकन मेजर आपल्याच सहकाऱ्यांवर बेछूट गोळीबार करून १३ जणांचे जीव घेतो तर ३२ जणांना जायबंदी करतो. मात्र याला दहशतवादी कृत्य (Act of terrorism) न मानता कार्यालयीन हिंसा (workplace violence) चं गोंडस नाव देऊन त्या अतिरेकी मेजरला वाचवलं जातं.

अशा अनेकानेक विषण्ण करून सोडणाऱ्या धक्कादायक अशा प्रसंगांनी हे पुस्तक भरलेलं आहे. पण या सगळ्यांत मला सर्वांत धोकादायक वाटलेली गोष्ट म्हणजे लेखकाने दिलेल्या ब्रिटनमधल्या एका विज्ञान प्रदर्शनाचं उदाहरण. दावत या शब्दाचा अर्थ आपल्याला बॉलि'वीड'वाले सांगतात तसा मेजवानी असा मुळीच नसून, इस्लामच्या भाषेत दावत म्हणजे धर्मपरिवर्तन अर्थात काफरांना इस्लाममध्ये येण्यासाठी करण्यात आलेलं आवाहन/आमंत्रण असं आहे. या दावतचं एक धक्कादायक उदाहरण लेखक आपल्यासमोर उलगडून दाखवतो तेव्हा आश्चर्याचा दुःखद धक्का बसण्यापलीकडे आपल्या हातात काहीही राहत नाही!

२००६ सालापासून ब्रिटनमध्ये एका विज्ञानविषयक फिरत्या प्रदर्शनाचं आयोजन करण्यात यायला लागलं. या विज्ञान प्रदर्शनाची सुरुवात (इस्लामबहुल अशा) मँचेस्टर मधून करण्यात आली. Foundation for Science, Technology and Civilisation या संस्थेच्या माध्यमातून 'समृद्ध मुस्लीम वारशा' संदर्भात जनजागृती करण्यासाठी या प्रदर्शनाची योजना करण्यात आल्याचं सांगितलं गेलं. मुस्लीम जगताने आधुनिक जगाला विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयांसंदर्भात दिलेल्या देणगीची कल्पना आजच्या पिढीला यावी हा या प्रदर्शनाचा उद्देश होता. या प्रदर्शनाचं नाव होतं '१००१ islamic inventions' अर्थात '१००१ इस्लामी शोध'. या प्रदर्शनाचं आयोजन अतिशय भव्यदिव्य स्वरूपात करण्यात आलं होतं. या प्रदर्शनासाठी ब्रिटिश आमदार, खासदार, मंत्री यांसारख्या मान्यवरांना तर आवर्जून आमंत्रणं देण्यात आली होतीच; पण त्याचबरोबर न्यू यॉर्कमधील युनायटेड नेशन्सचे प्रतिनिधी, ब्रसेल्समधलं युरोपीय पार्लमेंटचे सभासद अशा जगभरातल्या अनेकानेक प्रबळ लोकांनाही निमंत्रित करण्यात आलं होतं. त्यानंतर बेन किंग्जले या भारतीय वंशाच्या ब्रिटिश कलाकाराला घेऊन या प्रदर्शनावर एक लघुपट बनवून त्याचे जागतिक दौरे आयोजित करण्यात आले. इस्तंबूल, न्यूयॉर्क, लॉस अँजल्स इत्यादी ठिकाणी हे प्रदर्शन बघायला



लाखोंच्या संख्येने गर्दी लोटली. ज्यात अर्थातच शाळकरी विद्यार्थी-विद्यार्थिनींचा भरणा अधिक होता.

प्रदर्शनात इस्लामने जगावर केलेल्या उपकारांची यादीच्या यादी होती. घड्याळ, कॅमेरा, संगीत, स्वच्छता, भोजन, अन्नपदार्थ, फॅशन किंबहुना अगदी रुबिक'स क्यूबचा शोधसुद्धा इस्लामनेच लावला आहे असे दावे केले गेले. कला, बीजगणित, भूमिती, लेखनकला, शेती, वैद्यकशास्त्रातले सारे शोध, सारं ज्ञान एवढंच नव्हे तर; धरणं, पवनचक्क्या, व्यापारउद्यम, कापडचोपड, कागदनिर्मितीची कला, कुंभारकाम, काचनिर्मितीची कला, दागिने, चलन (currency) हे सारं सारं जगाला इस्लाममुळे मिळालं असंही ठामपणे सांगितलं गेलं. अगदी विमानाचा शोधदेखील नवव्या शतकात अब्बास इब्न फिरनास या मुस्लीम माणसाने लावला असं ठासून सांगितलं गेलं.

मी वर म्हटल्याप्रमाणे हे पुस्तक अशा चमत्कारिक आणि धक्कादायक गोष्टींनी भरलेलं आहे. मात्र हे १००१ islamic inventions प्रकरण मला सर्वाधिक गंभीर वाटलं. या प्रदर्शनांना हजारो, लाखो शाळकरी विद्यार्थी विद्यार्थिनी भेट देतात आणि आपण वापरतो ती प्रत्येक जीवनावश्यक वस्तू, प्रत्येक वैद्यकीय, स्थापत्यविषयक, विज्ञानविषयक शोध हा इस्लामनेच लावला आहे हे असत्य त्यांच्या कोवळ्या मनावर नकळतपणेच पण अगदी ठामपणे सत्य म्हणून बिंबवलं जातं. त्यांच्या मनात आपोआपच इस्लामबद्दल आदर निर्माण होतो, हळूहळू तो वाढत जातो आणि आपसूकपणेच ते इस्लामकडे आकृष्ट होतात. सुरुवातीच्या काळात तलवारीच्या बळावर आणि काही शतकांनी ती पद्धत कालबाह्य व्हायला लागल्यानंतर आधुनिक विश्वात लव जिहाद, लँड जिहाद, अनेक अपत्यं जन्माला घालून आपली संख्या वाढवण्याच्या अनेक प्रयत्नांपैकी हा सर्वांत नवीन आणि अत्यंत आकर्षक आणि रक्तविहीन असा धर्मप्रसाराचा हा 'कॅच-देम-यंग जिहाद' म्हणावा लागेल.

डग्लस मरेच्या 'इस्लामोफिलिया' या पुस्तकाला मेलनी फिलिप्स या अतिशय अभ्यासू ब्रिटिश पत्रकाराची प्रस्तावना लाभली आहे. त्यानिमित्ताने मेलनी फिलिप्सच्या लंडनिस्तान (Londonistan: How Britain is creating a Terror State within) या पुस्तकाचा परिचय झाला आणि ते पुस्तक आपोआपच २०२५ च्या वाचायच्या यादीत समाविष्ट झालं.

दरम्यान ब्रिटनमधल्या पाकिस्तानी ग्रूमिंग गँग्ज आणि त्याबाबतीतली सरकारी पातळीवरची निष्क्रियता, ब्रिटनचे अनेक तत्कालीन मंत्री त्याचप्रमाणे ग्रूमिंग गँग्जच्या खटल्यादरम्यान प्रमुख सरकारी वकील असणारा आणि त्यावेळी ज्याने हे प्रकरण जाणूनबुजून दाबून टाकलं असा आणि आत्ता चक्क ब्रिटनचा पंतप्रधान असणारा नीचतम इसम कीअर स्टार्मर अशा सर्वांवर सध्या इलॉन मस्क आपल्या या प्लॅटफॉर्मवरून टीकेची झोड उठवत आहे. (अर्थात पूर्वाश्रमीचं ट्विटर वोक लोकांच्या कचाट्यातून बाहेर पडल्याचा परिणाम). या संदर्भातच आज युट्युबवर 'इस्लामोफिलिया' च्या डग्लस मरेचा एक पॉडकास्ट समोर आला. (पॉडकास्टची लिंक प्रतिक्रियेत) त्यात डग्लस मरेने इस्लामचा युरोपमधला प्रसार, ग्रूमिंग गँग्ज, या सगळ्याविरुद्ध लढणारा टॉमी रॉबिन्सन इत्यादींविषयी भाष्य केलं आहे. डग्लस मरेच्या भाषणात दोन मुद्दे मला विशेष महत्त्वाचे वाटले.

१. पहिला मुद्दा म्हणजे डग्लस मरेने ऑक्सफर्डशर मधल्या अत्याचारी पाकिस्तानी टोळ्यांच्या तावडीतून महत्प्रयासाने सुटून आलेल्या एका अल्पवयीन मुलीवर गुदरलेल्या भयावह प्रसंगाचं वर्णन केलं आहे (१४:०० ते १७:००). ऑक्सफर्डशर मधल्या एका अनाथाश्रमातली मुलगी दुर्दैवाने या पाकिस्तानी टोळ्यांच्या तावडीत सापडली. त्या लोकांनी तिला जबरदस्तीने अंमली पदार्थांचं सेवन करायला लावून, अनेक दिवस तिच्यावर सामूहिक अत्याचार केले. एक दिवस सुदैवाने ती त्यांच्या तावडीतून निसटली आणि कशीबशी कॅब पकडून तिच्या

अनाथाश्रमात आली. पण अर्थातच तिच्याकडे कॅबच्या भाड्याचे पैसे नव्हते. तिने अनाथाश्रमाच्या स्त्री (!!!!) अधिकाऱ्याला भाड्याचे पैसे भरण्याची विनंती केली असता तिने ती विनंती सरळसरळ नाकारली. दरम्यान पाकिस्तानी टोळ्या तिला शोधत शोधत त्या अनाथाश्रमापर्यंत येऊन पोचल्या. आपल्या सावजाला तिथे पाहताच त्यांनी तिला तिथून पुन्हा उचललं आणि त्यांच्या अड्ड्यावर घेऊन गेले आणि तिच्या दुर्दैवाचे दशावतार पुढची कित्येक वर्षं असेच चालू राहिले. काही वर्षांनी या पाकिस्तानी टोळ्यांविरुद्ध खटला उभा राहून या घटनेचा उलगडा झाला असता अनाथाश्रमाच्या त्या असंवेदनशील, बेजबाबदार आणि अकार्यक्षम स्त्री अधिकाऱ्यामुळे त्या मुलीच्या आयुष्याचं वाटोळं झाल्याचं लक्षात आलं. त्यानंतर त्या स्त्रीने निगरगट्टपणे फक्त दोन ओळीत दिलगिरी व्यक्त करून प्रकरण संपवून टाकलं!

२. दुसरा मुद्दा वेगळ्या प्रकारे महत्त्वाचा आहे. ब्रिटिश लोकांनी जेव्हा जगभरातल्या देशांना अंकित करत आपल्या वसाहती त्या त्या ठिकाणी स्थापन करायला सुरुवात केली त्यावेळी तिथल्या तथाकथित मागासलेल्या लोकांच्या अंधःकारमय जीवनात आशेचे किरण फुलवण्याची, त्यांचं जीवन सुखकर करण्याची जबाबदारी (White Man's burden) येशूने आपल्या सक्षम खांद्यांवर सोपवली असल्याच्या भ्रमात ते वावरत असत. थोडक्यात, ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी त्या देशांची संस्कृती, व्यवहार, आचारविचार, देव, धर्म हे सगळं हीन प्रतीचं, अज्ञानमय, अंधःकारमय होतं असा स्थानिक जनतेचा समज करून देण्याचा त्यांचा प्रयत्न असे. (अर्थात इस्लामच्या मतेदेखील मुहंमद पैगंबराला प्रेषितत्त्व प्राप्त होण्यापूर्वीच काळ हा अंधःकारमय काळच समजला जातो). या पॉडकास्टमध्ये एका प्रश्नाला उत्तर देताना (२३:०० पासून पुढे) डग्लस मरे दुर्दैवाने हेच सत्य सांगतो, मात्र यावेळी wokism च्या कृपेने ही परिस्थिती दस्तुरखुद्द ब्रिटनवर ओढवलेली आहे. गेली कित्येक वर्षं मीडियाच्या माध्यमातून ब्रिटनच्या नवीन पिढीसमोर ब्रिटनचा भूतकाळ अत्यंत मानहानीकारक रूपात मांडला जात आहे. म्हटलं तर हा काव्यगत न्याय झाला मात्र त्याच वेळी इस्लामच्या पोलादी पंज्यात एका माजी महासत्तेची मानगूट पकडली जात असून, वेळीच जागृत न झाल्यास हा इस्लामरुपी दैत्य जगभरातल्या अन्य देशांना भक्ष्य करण्यात कुचराई करणार नाही या भीषण सत्याची जाणीवही आपल्याला होते.

अर्थात जगाला कह्यात घेऊन संपूर्ण जग इस्लामी करून टाकण्याची इस्लामची विखारी मानसिकता ही जगभरातल्या woke नेत्यांच्या दृष्टीस पडत नसली तरी स्वतः इस्लामने मात्र आपल्या या विषारी लालसेचा छातीठोकपणे आणि निर्भयपणे वारंवार पुनरुच्चार केला आहे. इस्लामची असहिष्णुता, फक्त एकच देव, एकच प्रेषित मानण्याची आणि त्यामुळे इतर धर्म, पंथ, भाषा, देव, श्रद्धा यांना नाकारून टाकण्याची जहरी मानसिकता एव्हाना जगाला परिचित झालेली आहेच. यावर भरपूर लिहिलं, वाचलं, बोललं गेलेलं आहे. कशाचाही काहीही उपयोग होत नाही हेही एव्हाना आपल्याला माहीत झालेलं आहे. पण तरीही कधीतरी कुठेतरी एखादं पुस्तक वाचलं जातं, एखादा व्हिडीओ, पॉडकास्ट वगैरे बघितला जातो, त्यातलं इस्लामचं जहरी सत्य पुन्हा एकदा सामोरं येऊन प्रचंड हतबलता येते आणि ती अशी की-बोर्ड बडवून व्यक्त केली जाते. अर्थात या व्यतिरिक्त आपल्या हातात दुसरं आहे तरी काय म्हणा!

डग्लस मरेच्या पॉडकास्टची लिंक :
https://youtu.be/fDh85cohwms

**श्री. हेरंब ओक**
अभ्यासक व लेखक
डोंबिवली
भ्रमणध्वनी - ९७६९९ ४६८८८

●●●

कोणतेही स्वप्न नवसाने पूर्ण होत नाही, त्यासाठी मेहनतीचा डोंगर उचलावा लागतो.

# AT एनी कॉस्ट

*अभिराम भडकमकर हे एक बहुआयामी संवेदनशील व्यक्तिमत्त्व. त्यांची 'At एनी कॉस्ट' ही कादंबरी आपल्याला भावते. ती अशी का भावते? हे आपण वाचूनच ठरवू शकतो. म्हणून पुस्तक अवश्य वाचा. – संपादक*

अगदीं आत्ताच एका पूर्णपणे वेगळ्या संदर्भात कोरियन अर्थव्यवस्था आणि जागतिक क्रमवारीत त्याचे सुधारते स्थान या विषयावर एक लेख लिहित होतो. त्यावेळी लक्षात आलेली गोष्ट म्हणजे कोरिया (अर्थातच दक्षिण कोरिया) अर्थव्यवस्था सुधारण्यात वाढती विदेशी गुंतवणूक या घटकाचा फार महत्त्वाचा मोठा वाटा आहे. आणि अशा गुंतवणुकीत करमणूक क्षेत्राचा, विशेषत: TV मालिका, फार महत्त्वाचा वाटा आहे. आणि अशा पद्धतीने स्वतःच्या करमणूक क्षेत्रात असा विदेशी गुंतवणुकीचा ओघ लक्षणीय स्वरूपात खेचण्यासाठी कोरियन सरकारने स्वतःच्या करमणूक क्षेत्राची के कल्चर (K Culture) च्या नावाखाली अतिशय पद्धतशीरपणे जागतिक पातळीवर जाहिरात (जाहिरातबाजी नाही) केली आहे.

या 'के-कल्चर' चे महत्त्वाचे वैशिष्ट्य हे आहे की, कोणतीही कोरियन दूरदर्शन मालिका कधीही १९ भागापेक्षा जास्त भागांची नसते आणि यातला कोणताही एकही भाग कधीही सव्वा तास या वेळेपेक्षा जास्त मिनिटांचा नसतो. एकोणीस भाग मिळून जास्तीत जास्त २० तासांचीच मालिका हा त्यांचा तसा अलिखित, पण न चुकता पाळला जाणारा असा नियम आहे.

हे लक्षात आले आणि मला आपल्या देशातील अशा मालिकांचे स्मरण झाले. आणि अशावेळी मला पटकन अभिराम भडकमकर यांची जानेवारी २०१५ मधे पहिली आवृत्ती आणि जानेवारी २०१७ मध्ये तिसरी आवृत्ती प्रसिद्ध झालेली 'At एनी कॉस्ट' ही ३७२ पानी कादंबरी आठवली. (किंमत ३२५ रुपये)

एक सांगू ?

हा कोरियन अर्थव्यवस्थेचा लेख मी लिहीत होतो तेव्हा मी रात्रभर कारने प्रवास करत होतो. बाहेरच्या अंधारात अधूनमधून काजवे चमकत होते. आणि ते काजवे बघून अभिराम भडकमकर यांच्या 'At एनी कॉस्ट' पुस्तकातले वाक्य मनात चमकायला लागले. त्या पुस्तकात अभिराम भडकमकर एके ठिकाणी म्हणतात. काजवे म्हणजे निसर्गाचे अंधारावरचे स्मितहास्य!

म्हणून राजहंस प्रकाशन याने प्रसिद्ध केलेली ही कादंबरी पुन्हा एकदा वाचली.

खरं म्हणजे, अभिराम भडकमकर यांची सगळ्यात आधी 'At एनी कॉस्ट' ही कादंबरी २०१५ साली प्रकाशित झाली. मग २०२० साली इन्शाअल्लाह आणि त्यानंतर २०२४ साली सीता.

पण गेल्या महिनाभरात माझ्याकडून सीता, इन्शाअल्लाह, 'At एनी कॉस्ट' या उलट्या क्रमाने त्यांची पुस्तके वाचली गेली. असो.

तशीही ही कादंबरी मला महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक झाल्यापासून, विशेषत: या निवडणुकीचे निकाल लागल्यापासून तर फारच आठवत होती !

या निवडणूक निकालात महायुतीला इतके निर्विवाद बहुमत मिळूनही मुख्यमंत्री ठरण्यात / ठरवण्यात झालेला विलंब, हा निर्णय झाल्यानंतरही मंत्रिमंडळाचे सदस्य आणि खातेवाटप याबाबतही सुरू असलेली चर्चा या पार्श्वभूमीवर अभिराम भडकमकर यांच्या 'At एनी कॉस्ट' या कादंबरीतील एक वाक्य तर मला फारच आठवत होते. ...

अगदी निष्कारण ते वाक्य मला आठवत आहे असे म्हणालात तरी चालेल ...

अभिराम भडकमकर असे लिहितात.... गिधाडांनी वाघाच्या शिकारीतील उरलेले जमेल तितके लंपास करून खावे. वाघाशीच झुंज देण्याचा गाढवपणा करू नये.

या कादंबरीत अरविंद नावाचे एक व्यक्तिमत्त्व रंगवले आहे. ज्याची मूळची पार्श्वभूमी रंगभूमीची आहे.

वैचारिक वारसा वगैरे गोष्टी (ज्याला अलीकडच्या जमान्यात 'भानगड' म्हणतात!) ज्याच्या डोक्यात धुमाकूळ घालत राहतात असे हे व्यक्तिमत्त्व आहे. काही विचाराअंती तो नाट्यक्षेत्र सोडून मालिकांच्या दुनियेत येतो. तसे कुठेही स्पष्ट सांगितले नसले तरी कादंबरीचा बराचसा भाग हा तुमच्या – माझ्यासारखा सर्वसामान्य वाचक या अरविंदच्या नजरेतून, शब्दांतून वाचत राहतो. सदसद्विवेकबुद्धी जागृत असल्याने स्वतःला प्रश्न पडण्याची आणि ते निदान स्वतःला विचारण्याची सवय असणारा असे स्वतःचे वर्णन करून घ्यायला आपल्या सगळ्यांनाच आवडत असते. हा अरविंद नेमका तसाच आहे. कादंबरीच्या शेवटच्या टप्प्यावर तोच या क्षेत्राचा अविभाज्य भाग झाल्यासारखा प्रश्नाचे उत्तर शोधून देतो आणि त्यामुळे स्वतःला यशस्वी समजतो. हे तर एकदम आपल्या सगळ्यांच्याच व्यावसायिक आयुष्याचे यथार्थ चित्रण वाटायला लागते. आवडो, न आवडो; तो महिन्याचा पगार देतो अशी आपल्या आपल्या बॉसविषयीची भावना पदोपदी जाणवत राहते.

का कोण जाणे? पण या कादंबरीत असणारे अरविंद हे पात्र वाचत असताना मला राहून राहून निर्मला देशपांडे यांच्या 'टिकली येवढं तळं' या जुन्या कादंबरीतले निशिकांत हे व्यक्तिमत्त्व सारखे आठवत होते.

या पुस्तकाचा सगळ्यात लक्षणीय भाग म्हणजे मालिका सुरू करणे आणि मालिका सुरू ठेवणे या दोन्हींत असणारी अस्सल व्यावसायिक गणिते या विषयाची झालेली मांडणी !

अशा मालिकांचा चित्रीकरणाच्या निमित्ताने एखाद्या ठिकाणी तीन – चार महिने मुक्काम पडला की, तिथली स्थानिक अर्थकारणाची समीकरणे कशी बदलत जातात आणि बदलत राहतात याचे प्रत्ययकारी वर्णन व चित्रण हा या कादंबरीचा लक्षणीय पैलू आहे. रामायण मालिका सुरू असताना बदललेले उंबरगाव, चॅनल्सची वाढती संख्या आणि त्यांचे अहोरात्र प्रक्षेपण व त्याआधी चित्रीकरण यातून ठाणे ते बोरिवली या घोडबंदर पट्ट्यात निर्माण झालेले असंख्य स्टुडिओ आणि त्यातून तिथले बदललेले अर्थकारण याची संगती ही कादंबरी वाचताना नकळत लागत जाते.. अगदी तो या कादंबरीचा उद्देश नसला तरी!

आत्ता हे पुस्तक वाचावे असे वाटण्याचे अजून एक कारण म्हणजे या पुस्तकाचे लेखक सध्या गाजत असलेल्या संयुक्त मानापमानची गोष्ट  या नाटकाशीही संबंधित आहेत. या नाटकाचे दोन महानायक स्वर्गीय केशवराव भोसले आणि बालगंधर्व हे त्यांच्या काळातील माध्यमांतरचे साथीदार आणि साक्षीदार आहेत ... नाटकाकडून सिनेमाकडे असे ते माध्यमांतर !

तर 'At एनी कॉस्ट' या पुस्तकाचा विषय आहे दुसरे माध्यमांतर... सिनेमाकडून दूरदर्शनकडे आणि एकमेव अशा दूरदर्शनकडून असंख्य अशा वाहिन्यांकडे असे हे माध्यमांतर ! या पुस्तकात अशा बदलाचे वर्णन करताना अभिराम भडकमकर लिहितात....

फक्त नवे माध्यम आलेले नाहीये. फक्त व्यक्ततेचे माध्यमच बदललेले नाहीये, तर व्यक्ततेच्या सगळ्या आपल्या जुन्या समजुती आणि निकषच मुळापासून हलताहेत.

माझ्या ४० वर्षांच्या व्यावसायिक आयुष्यात मी वित्तीय सेवा क्षेत्रातील प्रत्येक बदलाचा साक्षीदार, साथीदार असल्याने मला या पुस्तकाचा हा पैलू अगदी मनापासून पटला आहे.

---

वेळेजवळ इतका वेळ नसतो, की वेळ तुम्हांला परत वेळ देईल.

हे पुस्तक प्रकाशित झाल्या झाल्या मी हे पुस्तक वाचले होते. आत्ता परत वाचले. या दोन्हींवेळा माझ्या मनात आले की, एकंदरीतच आपल्या सर्वांच्याच आयुष्यात आधीं व्हॉट्सप, फेसबुक, इंस्टाग्राम सारखी समाज – माध्यमे आणि आता कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial intelligence) यातून जे स्थित्यंतर घडले आहे आणि घडू घातले आहे त्याच्याशी या पुस्तकाचा आशय ताडून पाहाणे फार महत्त्वाचे आहे ...

अभिराम भडकमकर सर, तुम्ही या विषयावर तुमची पुढची कादंबरी लिहा प्लिज! अगदीं 'At एनी कॉस्ट!'

असे वाटण्याचे कारण म्हणजे कोणत्याही माध्यमांतर होण्याच्या काळात आपल्या सारख्या सर्वार्थाने मध्यमवर्गीय, मध्यममार्गीय माणसे आपल्या अस्तित्वाची खूणगाठ शोधत असतो. या पुस्तकात अशा परिस्थितीत कसे जगायचे, कसे वागायचे याबाबत भाष्य करताना असे म्हटले आहे ....

इथे टिकायचे तर पाठीचा कणा लवचिक हवा. कुणासमोरही झुकेल असा आणि जिभेला हाड असता कामा नये. कुणाच्याही स्तुतीसाठी तिला एका क्षणात सज्ज व्हायला हवे. आता यावर वेगळे काय .....

अशी माध्यमांतर होण्याची परिस्थिती एक साशंकता, पराकोटीची साशंकता निर्माण करते. त्याच्या आनंदाचा अस्तित्वकाल अल्पायुषी असण्याचा त्याला अभिशाप आहे. त्यामुळे दुःख चोंबाळत बसायला सुद्धा फुरसत मिळत नाही. असलेले आणि नसलेले कोडगेपण मिरवत पशुवत वागावे लागते. पण ते सोपे नसते ना ! सोवळे तर सुटले; ओवळे मात्र सापडत नाही अशातली ही गत आहे.

त्याबाबत या पुस्तकात आपल्यातले जनावर काही टाकवत नाही आणि माणूसपणाचे ओझे काही पेलवत नाही असा फार सुरेख उल्लेख आहे.

का कोण जाणे! पण हा उल्लेख या पुस्तकात वाचला आणि मला लख्खकन पु. ल. देशपांडे यांच्या वंगचित्रे पुस्तकातला एक उल्लेख आठवला. तो उल्लेख असा आहे... गाढवाचे पिल्लू सुद्धा त्याच्या लहानपणी सुंदर दिसते. काळाच्या ओघात त्याचे फक्त गाढवपण वाढत राहते आणि तेवढेच व तेच शिल्लक राहते.

नवीन माध्यम हे अनेकदा असा गाढवा सारखा अनुभव देते !

तिथे पु. ल. देशपांडे असे म्हणतात .... काळाच्या ओघात माणसाचे असे फक्त 'माणूसपण' वाढतं आणि शिल्लक राहत गेले तर ! ते होत नाही हीच तर अडचण आहे. याचे यथार्थ वर्णन म्हणजे अभिराम भडकमकर यांचें 'At एनी कॉस्ट' हे पुस्तक !

त्यामुळे अशी माध्यमांतरे सुबत्ता आणतात. यश आणतात. अगदीं नक्की आणतात. पण त्यातून अगदी चिरस्थायी जरी नाही तरी दीर्घकालीन असे काय हाती लागते? आणि हे सगळे At What Cost ?

ते मिळवण्यासाठीच सर्वंकष प्रयत्न म्हणजे 'At एनी कॉस्ट' ! म्हणून या पुस्तकात एके ठिकाणी लेखक अभिराम भडकमकर प्रश्न उपस्थित करतात ....

अर्जुन जिंकला; अर्जुन सुखी झाला का ? या पुस्तकात हे वाक्य वाचले आणि मला महामहोपाध्याय साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांची महाभारतावरील व्याख्याने आठवली. त्या व्याख्यानात बाळशास्त्री हरदास हा पैलू अनेकदा अधोरेखित करतात.

एकंदरीतच 'At एनी कॉस्ट' ही कार्यपद्धती असते; At What Cost हा मोजमाप करण्यासाठी तयार केलेला निकष ... एक निकष; एकमेव नव्हे !

'At एनी कॉस्ट !'

**– चन्द्रशेखर टिळक**
सी–४०२, राज पार्क, मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व), पिन – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६

# परिसर वार्ता

– संकलित

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- ठाणे जिल्हा ॲथलेटिक्स ३००० मीटर धावणे या स्पर्धेत इ. ९वी मधील कु. द्रोण बोऱ्हाडे याचा द्वितीय क्रमांक आला.



- जिल्हा स्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत कु. भैरवेश मोर (१०अ) यास तृतीय क्रमांक सहित ब्रांझ पदक प्राप्त झाले तर कु. स्वरूप लांजेकर (९अ) यास चौथा क्रमांक प्राप्त झाला.



- कु. दृष्टी प्रकाश देसले (१०अ) या विद्यार्थिनीस दि. १७ नोव्हेंबर रोजी झालेल्या १७ वर्षांखालील मुलींच्या जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत सुवर्णपदक, तसेच २५ नोव्हेंबर रोजी पालघर येथील विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक आणि धुळे येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत कांस्य पदक प्राप्त झाले.

- दि. २९ नोव्हेंबर रोजी वार्षिक क्रीडा महोत्सवास प्रारंभ झाला. वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त श्री. पंकज शिरसाट यांनी क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन केले. इ. ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी लंगडी, खोखो, कबड्डी, डॉजबॉल, व्हॉलीबॉल या सर्व सांघिक खेळांचे आयोजन केले गेले. या प्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना वाघुले, पर्यवेक्षिका सौ. बोऱ्हाडे, तसेच सर्व शिक्षक, खेळाडू विद्यार्थी उपस्थित होते.



- दि. १ डिसेंबर रोजी ठाणे राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत कु. अनिकेत कवळे या विद्यार्थ्यास १४ वर्षांखालील गटात कांस्य व सुवर्णपदक प्राप्त झाली व त्याची राष्ट्रीय पातळी प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.

- अथर्व गणेश कदम (९अ) या विद्यार्थ्याने बुद्धिबळ क्रीडा ट्रस्ट, पुणे आयोजित श्री. महेश्वरानंद सरस्वती मेमोरिअल रॅपीड बुद्धिबळ स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत ४००० रुपये रोख रक्कम जिंकली आहे.



- MKCL Olympiad Movement (Mom Online Exam) परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे:–

१. वेदांग महेश परळकर ८–अ (राज्यस्तरीय गुणानुक्रम २६१ वा)

२. जुईली आदेश ठाणेकर ८–अ (राज्यस्तरीय गुणानुक्रम २५८ वा) तसेच

१. कौशल यशवंत गांगुर्डे ८–अ (जिल्हास्तरीय गुणानुक्रम)

२. आर्यन सचिन यादव ८-ब (जिल्हास्तरीय गुणानुक्रम)

- यावर्षी डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक लेखी परीक्षेसाठी सहावीतील १७ विद्यार्थी तर नववीतील १ विद्यार्थी सहभागी झाला होता. यापैकी इयत्ता सहावीचे एकूण ९ विद्यार्थी प्रमाणपत्रासाठी प्राप्त ठरले. तर दोन विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक पातळीसाठी निवड झाली.

- दि. २३/१२/२०२४ रोजी जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम, ठाणे अंतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे तर्फे मानसिक आजार, मानसिक आजारांबाबत गैरसमृद्धी व वास्तविकता यावर श्री. जयंत केदारे यांनी इयत्ता ८ वी व १० वीच्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांशी प्रश्न-उत्तरांद्वारे संवाद साधला.



- 'राष्ट्रीय छात्र सेना' अधिकारी प्रशिक्षण संस्था कामठी, नागपूर येथे आयोजित ४५ दिवसीय विशेष प्रशिक्षण श्री. संजय दिघे यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले, हे प्रशिक्षण दि. ८ नोव्हेंबर ते २२ डिसेंबर या कालावधीत संपन्न झाले. या प्रशिक्षणा दरम्यान संजय दिघे यांना कवायत, शारीरिक प्रशिक्षण, वॉटरमॅनशिप प्रशिक्षण, फायरिंग, नेतृत्व गुण, जीवन कौशल्य, वेस्ट मॅनेजमेंट, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट तसेच योगा यासारख्या महत्त्वाच्या विषयावर सखोल मार्गदर्शन मिळाले, तसेच कला या उपक्रम स्पर्धेत सादर केलेल्या पेंटिंगला बेस्ट आर्टिस्ट ऑफ द कोर्स चे प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.



- पोलिस आयुक्त कार्यालय, ठाणे, नौपाडा पोलिस स्टेशन, ठाणे तर्फे पोलिस रेझींग डे सप्ताह दिनांक ०२/०१/२०२५ ते दिनांक ०८/०१/२०२५ दरम्यान साजरा होणार आहे. या अंतर्गत दि. ३/०१/२०२४ रोजी सायबर सुरक्षा संदर्भात इयत्ता ८वी व १०वी च्या विद्यार्थ्यांना सहाय्यक पोलीस निरीक्षक ए. पी. आय. मा. श्री. दत्तात्रेय शंकर यादव, व सायली गुरव, नेहा निकाळे यांजकडून मार्गदर्शन करण्यात आले.

- ब्राह्मण सेवा संघ, ठाणे आयोजित विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे (लहान गट),

  * **अथर्वशीर्ष पाठांतर स्पर्धा**
    कु. विनया निलेश खामकर (प्रावीण्य संपादन)
  * **कथाकथन स्पर्धा**
    कु. यश मंगेश बोरघरे (उत्तेजनार्थ)
  * **वक्तृत्व स्पर्धा**
    कु. स्वरूपा देविदास कदम (प्रथम क्रमांक)
    कु. यश मंगेश बोरघरे (प्रथम क्रमांक)
    कु. विनया निलेश खामकर (द्वितीय क्रमांक)

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

### २२ नोव्हेंबर २०२४ – वेशभूषा दिवस

बालदिनाच्या निमित्ताने हा उपक्रम दरवर्षी घेतला जातो. यावर्षी दिवाळीच्या सुट्टीत बालदिन आल्याने हा उपक्रम दुसरे सत्र सुरू झाल्यावर २२ नोव्हेंबर रोजी घेण्यात आला. पुढीलप्रमाणे विषय देण्यात आले. मुलांनी त्यानुरूप सादरीकरण केले.

नर्सरी व ज्यूनियर के. जी. – कोणताही आरामदायक पोशाख (any comfortable costume)

सिनीयर – आवडते कार्टून पात्र किंवा आपले सहाय्यक किंवा एखादे पौराणिक पात्र.

१) प्रथम निरीक्षण निकाल –
प्रथम सत्राच्या निरिक्षणाचा निकाल पालकांना २२ नोव्हेंबर २०२४ या दिवशी देण्यात आला.

२) ७ डिसेंबर २०२४ – रोजी घेण्यात आलेल्या पालक सभेत पालकांना वार्षिक स्नेहसंमेलनाबद्दल माहिती व वेशभूषेची सविस्तर कल्पना देण्यात आली.

### वार्षिक स्नेहसंमेलन –

१७ डिसेंबर – माध्यमिक विभाग

१८ डिसेंबर – प्राथमिक विभाग

१९ डिसेंबर – पूर्व प्राथमिक विभाग

यावर्षी ‘आमचा प्रिय भारत’ (We Love Our Bharat) हा विषय शाळेने निवडला होता. सर्व विभागांत या विषयावर नृत्य व नाटुकली सादर करण्यात आली. नर्सरी, ज्यूनियर व सिनीयरच्या सर्व मुलांचा यात सहभाग होता. उपस्थितांच्या स्वागतापासून, दोन गाण्यांतील निवेदन व आभार प्रदर्शन सुद्धा आमच्या चिमुकल्यांनी खूप आत्मविश्वासाने केले व उपस्थितांची दाद मिळवली.

### २१ डिसेंबर २०२४ – आनंद मेळा

शनिवार २१ डिसेंबर रोजी शाळेच्या आवारात आनंद मेळा आयोजित करण्यात आला होता. मुलांनी केलेली ब्रेसलेट, त्यांची आवडती बिस्किटं, इ. गोष्टी विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. सिनीयरची काही मुले दुकानदार झाली होती. नर्सरी व ज्युनियरची मुले खरेदी करायला आली होती.

### २४ डिसेंबर २०२४ – नाताळ

ख्रिस्ती धर्मियांचा जगभरात साजरा होणारा ‘नाताळ’ सण २४ डिसेंबरला आम्ही शाळेत साजरा केला. लाल पांढऱ्या रंगाचे कपडे घातलेली आमची छोटी बालके फारच सुंदर दिसत होती. नर्सरी व ज्यूनियर साठी जास्मिन ग्रुपचा अभिराज बने तर सिनीयरसाठी मून गृपची सिमरन ‘सांताक्लॉज’ बनले होते. मावा केक व वेफर्सचा खाऊ मुलांना देण्यात आला.

### क्रीडा महोत्सव –

२६ डिसेंबर नर्सरी व सिनीयर – १०:३० ते १२:३०

२७ डिसेंबर – ज्युनियर – १०:३० ते १२.३०

ठाणे महाविद्यालयाच्या आवारात हा क्रीडा महोत्सव आयोजित केला होता. धावण्याची शर्यत, अडथळ्यांची शर्यत, सुईत दोरा ओवून धावणे इत्यादी विविध शर्यती घेण्यात आल्या. सर्व शर्यती मधून पहिला दुसरा, तिसरा क्रमांक काढण्यात आले त्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

सर्व नर्सरी व ज्यूनियरच्या मुलांना चित्र रंगवण्या–साठीची पुस्तके तर सिनीयरच्या सर्व मुलांना छोट्या वाक्यांची गोष्टीची पुस्तके बक्षीसे म्हणून देण्यात आली.

### २८ डिसेंबर २०२४ – सांस्कृतिक कला दर्पण आयोजित आंतरशालेय नृत्य नाटय स्पर्धा

गेली २५ वर्षे संस्कृती कला दर्पण या संस्थेतर्फे

आंतरशालेय नृत्य व नाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. गेली १२ वर्षे आमची शाळा या स्पर्धेत सहभागी होत आहे. यावर्षी धनगर नृत्य व (Snow White & Seven dwarfs) 'हिमगौरी आणि सात बुटके' हे नाटुकले सादर झाले. पुढील प्रमाणे बक्षिसे मिळाली.

१) धनगर नृत्य - प्रथम क्रमांक

२) नाटुकले - सर्वोत्कृष्ट नाटक

३) सौ. योगिता नाईक - सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक

४) कु. सोयरा काळे - सर्वोत्कृष्ट अभिनेत्री

प्राथमिक व माध्यमिक विभागाने सुद्धा अनेक बक्षिसे पटकावली यामुळे सर्वाधिक म्हणजे १२ पारितोषिके मिळणारी शाळा असल्याने फिरती ढाल सुद्धा पुन्हा एकदा ए. के. जोशी शाळेकडेच आली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग



कुमारी चैत्राली पवार हिने हिंदी राष्ट्रभाषा निबंध लेखन स्पर्धेत मुंबई विभागात प्रथम क्रमांक पटकावला.

इयत्ता ६ मधील मृण्मयी साठे हिने जिल्हास्तरीय जिम्नॅस्टिक्सद्वारे आयोजित २रा (फ्लोअर) आणि ३रा क्रमांक (बीम आणि व्हॉल्ट) पटकावला आहे.



आमच्या सर्व प्रिय विद्यार्थ्यांचे अभिनंदन! इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी 'महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे' आयोजित हस्तलेखन स्पर्धेत भाग घेतला आणि क्रमांक प्राप्त केले.





इयत्ता ७ वी मधील अर्जुन वायंगणकर याला झी मराठी अवॉर्ड्स २०२४ द्वारे आयोजित बेस्ट फ्रेंड पुरस्कार मिळाला.

सौ. ए. के. जोशी इंग्लिश मीडियम स्कूलने इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना सामाजिक सेवा उपक्रम म्हणून देणगी स्वरूपात मदत गोळा करण्यास सांगितले होते. ज्यामध्ये इच्छुक विद्यार्थ्यांनी 'हेल्प एज इंडिया' या प्रसिद्ध एनजीओसाठी एकूण रु.८८,२२९/- आनंदाने गोळा केले. शाळेला 'हेल्प एज इंडिया'कडून कौतुकाचे प्रमाणपत्र मिळाले आहे.





समाधानी राहण्यातच जीवनातील सर्वांत मोठे सुख आहे !

'अखिल भारतीय सांस्कृतिक संघा'तर्फे अबुधाबी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत इयत्ता आठवीतील निकिता जावडेकर हिने रौप्य पदक पटकावले आहे.



आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी संस्कार भारतीच्या 'दिवाळी परिवार मेळावा' या कार्यक्रमात श्रीमती वीणा जोशी लिखित आणि दिग्दर्शित पथनाट्य 'मी आणि माझी सवय' सादर केले. आमच्या विद्यार्थ्यांनी पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात आले.



आमच्या इयत्ता ७ वी आणि ८ वी च्या विद्यार्थ्यांनी ठाणे कॉलेजमध्ये YGCL (यंगर चॅम्पियन लीग) मध्ये भाग घेतला आणि प्रथम पारितोषिक मिळवले. इयत्ता ७वी मधील देवाशिषला सर्वोत्कृष्ट गोलरक्षक म्हणून गौरविण्यात आले.




## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### ३ डिसेंबर २०२४

डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना केळकर वझे महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षाने ३ डिसेंबर २०२४ रोजी फौजदारी कायद्यातील अलीकडील सुधारणा: महिलांचे कायदेशीर संरक्षण वाढवणे या विषयावर व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले होते.

डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना १० डिसेंबर रोजी प्रवीण गांधी लॉ कॉलेज, विलेपार्ले यांनी एलएलएम प्रबंध (व्यवसाय कायदा) साठी बाह्य पंच म्हणून आमंत्रित केले होते.

डॉ. श्रीविद्या जयकुमार यांची के. सी. विधी महाविद्यालय तसेच महाविद्यालय येथे विद्यापीठाकडून कुलगुरू प्रतिनिधी म्हणून कॅस (CAS) समिती वर नेमणूक करण्यात आली. तसेच प्रवीण गांधी विधी महाविद्यालयाच्या निवड समिती मध्ये देखील त्यांची निवड करण्यात आली.

### १० डिसेंबर मानवी हक्क दिवस

१० डिसेंबर २०२५ रोजी मानवी हक्क दिन वि.प्र.मं.चे ठा.म.पा विधी महाविद्यालय, ठाणे येथे महिला विकास कक्ष (WDC) अंतर्गत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. हेतल मेशेरी, WDC/ICC प्रभारी यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी विद्यार्थ्यांना मानवी हक्क दिनाचे महत्त्व स्पष्ट केले आणि त्यांच्या दैनंदिन आयुष्यात मानवी हक्क जोपासण्याचे आवाहन केले. त्यांनी न्याय्य समाजाच्या निर्मितीसाठी मानवी हक्कांची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांचे प्रेरणादायी भाषण. त्यांनी भारतीय

संविधान आणि मानवी हक्क यांवरील त्यांच्या विचारसरणीचा सखोल आढावा दिला. त्यांच्या भाषणातून प्रत्येक भारतीय नागरिकाच्या सन्मान, स्वातंत्र्य, आणि समानतेची हमी देणाऱ्या मूलभूत अधिकारांचे महत्त्व उलगडले. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभाग नोंदवला, त्यांच्या उत्साहाने कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण झाला. कार्यक्रमाचा समारोप समानतेचे आणि समावेशकतेचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या संदेशाने झाला, ज्यामुळे सर्वांना न्याय्य आणि समता आधारित समाज निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली.







**कॉलेजच्या जमिनीवर आरक्षण**

ठाणे महापालिकेने कॉलेज कॅम्पसच्या जागेवरील आरक्षण रद्द केले. कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त करत ठाणे महापालिकेला आभार पत्र पाठवले. सन्माननिय न्यायमूर्ती अनिल जोशी यांनी देखील ठाणे महानगरपालिकेचे आभार मानणारे पत्र पाठवले आणि ठाणे महानगरपालिकेच्या कॉलेज कॅम्पसमधील आरक्षण रद्द करण्याच्या निर्णयाचे समर्थन केले ज्यामुळे ठाण्यातील शिक्षणाला निःसंशयपणे चालना मिळेल.

**बार कौन्सिल ऑफ इंडीयाचे परिपत्रक**

बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या दिनांक परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांना गुन्हेगारी रेकॉर्डवरील घोषणापत्र, एकाचवेळी इतर अभ्यासक्रम न करणे, नोकरीच्या ठिकाणाहून ना हरकत प्रमाणपत्र आणि उपस्थितीचा पाठपुरावा सादर करण्याची सूचना देण्यात आली होती.

बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या परिपत्रकाचे पालन करून विद्यार्थ्यांना गुन्हेगारी रेकॉर्डवरील घोषणापत्र, तसेच एका वेळी अनेक अभ्याक्रम न करण्याबाबत घोषणापत्र आणि रोजगार करत असलेल्या ठिकाणाहून ना हरकत प्रमाणपत्र व महाविद्यालयात उपस्थिती बाबत घोषणापत्र सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या बायोमेट्रिक हजेरीसाठी तीन बायोमेट्रिक मशीन खरेदी करण्यात आल्या आहेत.

**१४ व्या स्वर्गीय प्रभाकर हेडगे व्याख्यानमाला : वैवाहिक कायदे : 'विकसित दृष्टिकोन आणि पद्धती'**

१५ डिसेंबर २०२४ रोजी, विधी फाऊंडेशनतर्फे आयोजित १४ व्या 'स्वर्गीय प्रभाकर हेडगे व्याख्यानमाले'त ठाण्यातील वि.प्र.मं.चे ठा.म.पा विधी महाविद्यालय सक्रिय सहभाग घेतला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून माननीय न्यायमूर्ती मिलिंद एन. जाधव उपस्थित होते. त्यांनी 'वैवाहिक कायदे: विकसित दृष्टिकोन आणि पद्धती' या विषयावर व्याख्यान दिले. न्यायमूर्ती जाधव यांनी वैवाहिक कायद्यांच्या बदलत्या स्वरूपावर व त्या क्षेत्रातील प्रगत पद्धतींवर सखोल व उपयुक्त माहिती दिली. त्यांनी या क्षेत्रातील कायद्यांच्या अंमल-बजावणीतील आव्हाने व त्यांवर उपाययोजना यावर सविस्तर चर्चा केली. हा सत्र खूपच माहितीपूर्ण व उपस्थित सर्वांसाठी उपयुक्त ठरला. कौटुंबिक न्यायालय ठाण्याच्या माननीय न्यायाधीश श्रीमती एन. ए. नाईक या कार्यक्रमाच्या सन्माननीय अतिथी होत्या. त्यांच्या

उपस्थितीमुळे कार्यक्रमाची महत्ता वाढली. त्यांनी वैवाहिक वादांमधील मानवी दृष्टिकोनाची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमादरम्यान १२ विधी महाविद्यालयांतील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले. व्हीपीएमच्या टीएमसी लॉ कॉलेजकडून मिहीर कोळेकर यांना उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीमुळे महाविद्यालयाचा अभिमान वाढला. या कार्यक्रमाला व्हीपीएमच्या टीएमसी लॉ कॉलेजचे एकूण ३५ विद्यार्थी व एक प्राध्यापक सहाय्यक प्राध्यापक डॉ. रुपाली जमोदे यांनी हजेरी लावली. विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम प्रेरणादायी व ज्ञानवर्धक असल्याचे सांगितले. या कार्यक्रमामुळे त्यांना नामवंत विधिज्ञांशी संवाद साधण्याची व इतर महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांशी नेटवर्किंग करण्याची संधी मिळाली. हा कार्यक्रम उत्कृष्टपणे आयोजित व राबविण्यात आला. यातून वैवाहिक कायद्यांवरील मौल्यवान माहिती मिळाली तसेच विधी प्रक्रियेतील प्रगत दृष्टिकोन अधोरेखित करण्यात आला. शैक्षणिक प्राविण्याला प्रोत्साहन देण्याचे हे व्यासपीठ खूपच प्रभावी ठरले.







**सत्र – १ च्या विद्यार्थ्यांच्या अतिरिक्त वर्ग चाचणी आणि अंतर्गत व्यावहारिक प्रशिक्षण परीक्षा :**

| विषय | वेळ | तारीख |
|---|---|---|
| कामगार कायदा करार – १ | ३.०० ते ४.०० | १२.१२.२०२४ |
| नुकसानीचा कायदा कायदेशीर भाषा आणि कायदेशीर लेखन | ३.०० ते ४.०० | १३.१२.२०२४ |

**१८ डिसेंबर अल्पसंख्याक हक्क दिन साजरा**

वि.प्र.मं.चे ठा.म.पा विधी महाविद्यालय येथे अल्पसंख्याक हक्क दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश अल्पसंख्याक समुदायांच्या हक्कांबाबत जागरूकता निर्माण करणे आणि त्यांचा सन्मान जपणे हा होता.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. रुपाली जमोदे, सहायक प्राध्यापक यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी अल्पसंख्याक हक्क दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. या कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण म्हणजे प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांचे मार्गदर्शनपर भाषण. त्यांनी अल्पसंख्याकांसाठीच्या संविधानिक तरतुदींबद्दल माहिती दिली आणि समानता व विविधतेला स्वीकारण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांचे भाषण माहितीपूर्ण आणि प्रेरणादायी होते. यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रादेशिक भाषांमध्ये भाषणे सादर केली. त्यांनी अल्पसंख्याक आयोग अधिनियम, १९९२ आणि अल्पसंख्याक हक्कांचे संरक्षण करणाऱ्या संविधानिक तरतुदी यावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणातून भारताची भाषिक आणि सांस्कृतिक विविधता प्रभावीपणे व्यक्त झाली. उपस्थितांनी त्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. कार्यक्रमाचा समारोप सर्व सहभागींचे आभार मानून झाला. हा कार्यक्रम सर्वांसाठी एका अर्थपूर्ण आणि यशस्वी समारंभाचा अनुभव ठरला.

'कौतुक' हा शब्द छोटा आहे, मात्र कौतुक करण्यासाठी मन मात्र मोठं लागतं !



**ग्राहक विवाद आणि मोटार अपघाताचे दावे, कायदा, प्रक्रिया आणि सराव : एक दिवसीय कार्यशाळेचा अहवाल :**


२१ डिसेंबर २०२४ रोजी वि.प्र.मं.चे ठा.म.पा विधी महाविद्यालय येथे ग्राहक विवाद आणि मोटार अपघाताचे दावे, कायदा, प्रक्रिया आणि सराव या विषयावर एक दिवसीय कार्यशाळाचे आयोजन दुपारी १.३० ते ८.०० या वेळेत करण्यात आले. कार्यशाळाची सुरवात महाविद्यालयच्या प्राचार्य श्रीविद्या जयकुमार यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. या कार्यशाळेचे सूत्रसंचलन सहा. प्रा. कृष्णा कामथ यानी केली. उदघाटन भाषण मा. श्री. न्या. एस. पी. तावडे, महाराष्ट्र राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाचे अध्यक्ष आणि मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश यानी केले. डॉ. ऋचा बनसोड, जिल्हा ग्राहक तंटा निवारण आयोगाच्या अध्यक्षा यानी ग्राहक हक्काची उत्क्रांती आणि ग्राहक संरक्षण कायदा २०१९ या विषयावर या कायद्याचे सर्वसमावेशक महिती दिली. डॉ. अरुण आर. गायकवाड, जिल्हा ग्राहक वाद निवारण आयोग, पुणे, यानी ग्राहक विवाद हाताळण्यासाठी गुंतलेल्या कायदेशीर संकल्पना अतिशय सोप्या पद्धतिने समजावून सांगितले. उपस्थित सर्व मान्यवरांची ओळख प्रा. हेतल मेशरी यानी करून दिली. आभार प्रदर्शन सहा.प्रा. डॉ. रुपाली जामोदे यानी केली. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात 'बेपर्वाई आणि मोटार अपघात' या विषयावर श्री. भूषण राऊत, ठाणे येथील वाहतूक विभागाचे अध्यक्ष यानी राहदारीचे नियमांचे महत्त्व समजावून त्यांचे पालन केल्यस अपघात कमी होऊ शकतात याची महिती दिली. या कार्यशाळेत उपस्थित ॲड. केशवा पुजारी यानी सुद्धा सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेत उपस्थित वक्त्यांचा परिचय सहा.प्रा. चंदणी घोगरे यानी सर्वांना करून दिली. यावेळी प्रा. विनोद वाघ यांनी देखील विद्यार्थ्याना मार्गदर्शन केले. सहा.प्रा. शिवाजी बिबे यांनी सर्वांचे आभार प्रदर्शन केले. सर्व शिक्षक-शिक्षकतर कर्मचारी या कार्यशाळेत उपस्थित होत. सदर कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. या कार्यशाळेचा शेवट महाराष्ट्र गीताने झाला.



**सर्व विधी विद्यार्थींना २५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर नाताळ सुट्टी तसेच सत्र ४ आणि ६ चे वर्ग १ जानेवारी २०२५ पासून सुरू होतील.**

**कॉनक्वेस्ट २०२४ – पश्चिम प्रादेशिक फेरीतील सहभाग अहवाल :**

वि.प्र.मं.चे ठा.म.पा विधी महाविद्यालयच्या विद्यार्थ्यांनी कॉनक्वेस्ट २०२४ या भारतीय संविधान, इतिहास आणि राजकारण यावरील राष्ट्रीय स्तरावरील क्विझ स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला. ही स्पर्धा सेंटर फॉर लॉ अँड पॉलिसी रिसर्च (CLPR), बेंगळुरू यांनी आयोजित केली होती व ९ डिसेंबर २०२४ रोजी टाटा इंस्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS), मुंबई येथे पार पडली. कॉनक्वेस्ट ही स्पर्धा भारताच्या संविधानिक वारशाचा उत्सव साजरा करणारी एक प्रमुख शैक्षणिक उपक्रम आहे. यावर्षीच्या स्पर्धेत विविध प्रतिष्ठित महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.


ST. JOSEPH'S COLLEGE OF LAW
(Affiliated to KSLU & Approved by BCI)
Certificate of Participation
SEMINAR ON
"NAVIGATING THE INTERSECTION OF ARTIFICIAL INTELLIGENCE AND INTELLECTUAL PROPERTY RIGHTS"
This is to certify that Mr. / Ms. Samata Joshi of VPM'S Thane Law College College / University has Participated in the seminar organised by St. Joseph's College of Law, Bengaluru held on 13 December, 2024
FR. JERALD D'SOUZA SJ
DIRECTOR
DR. PAULINE PRIYA
PRINCIPAL

आमच्या महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणारे प्रथम वर्षाचे विद्यार्थी श्री. अनिकेत जाधव, कु. अदिती दारेकर, आणि कु. माधुरी शिवथरे यांनी स्पर्धेत सहभाग घेतला. त्यांनी संविधान, इतिहास आणि राजकारण यावरील चुरसपूर्ण फेऱ्यांमध्ये आपले ज्ञान व कौशल्य दाखवले. या अनुभवातून त्यांना भारतीय संविधानाचे सखोल ज्ञान आणि राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात्मकता समजली. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाबाबत अत्यंत सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या व हा अनुभव बौद्धिकदृष्ट्या समृद्ध करणारा असल्याचे नमूद केले. आम्ही अशा महत्त्वाच्या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करत राहू.

**सत्र–३ आणि सत्र – ५ च्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा खालील वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात आल्या.**

| विषय | वेळ | तारीख |
|---|---|---|
| प्रशासकीय कायदा | दु.२.३० ते सायं.५.०० | १८ नोव्हेंबर २०२४ |
| मालमत्ता हस्तांतरण कायदा आणि सुलभता कायदा | दु.२.३० ते सायं.५.०० | २२ नोव्हेंबर २०२४ |
| कंपनी कायदा | दु.२.३० ते सायं.५.०० | २६ नोव्हेंबर २०२४ |
| कौटुंबिक कायदा–II | दु.२.३० ते सायं.५.०० | ७ डिसेंबर २०२४ |
| दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ आणि मर्यादा कायदा १९७३ | स.१०.३० ते दु.१.०० | ३० नोव्हेंबर २०२४ |
| फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ | स.१०.३० ते दु.१.०० | १४ डिसेंबर २०२४ |
| कामगार कायदा आणि औद्योगिक संबंध–II | स.१०.३० ते दु.१.०० | २५ नोव्हेंबर २०२४ |
| सार्वजनिक आंतरराष्ट्रीय कायदा | स.१०.३० ते दु.१.०० | २७ नोव्हेंबर २०२४ |

२१ डिसेंबर पासून 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम अंतर्गत विधी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसमवेत ग्रंथालयाची स्वच्छता उपक्रम करून त्याचे छायाचित्र संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले.





शब्द म्हणजे जणू बियाच; ज्यांची वाढ माणसाच्या मनात होते.

**एल.एल.एम.प्रवेश प्रक्रिया :**

२१ डिसेंबर रोजी पहिली गुणवत्ता यादी अधिसूचित करण्यात आली आणि विनाअनुदानित एलएलएम च्या प्रथम वर्षाच्या ६० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली. १८ प्रवेश पूर्ण झाले आहेत आणि दुसरी गुणवत्ता यादी २८ डिसेंबर रोजी अधिसूचित करण्यात आली आहे. ३१ डिसेंबरपर्यंत २२ प्रवेश झाले आहेत.

**बार कौन्सिल ऑफ इंडियाला मंजुरीसाठी ऑनलाइन अर्ज सादर केला आहे.**



महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक श्री. विनोद हरिभाऊ वाघ यांची पदोन्नतीची शिफारस मुंबई विद्यापीठ नियुक्त समितीने व सह. निबंधक, उच्च शिक्षण यांनी दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी केली.

**विशेष ऑनलाईन व्याख्यान**

महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक श्री. विनोद एच वाघ यांनी नाताळाच्या सुट्टीत 'इतराप्रतीचे दायित्व' या अपकृत्यसंबधी कायद्यावर दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ रोजी ऑनलाईन व्याख्यान घेतले.

**'गुन्हेगारी बाजूने भारतातील न्याय वितरण प्रणाली' या विषयावर सर लालूभाई शाह स्मृती व्याख्यान :**

२३ डिसेंबर रोजी ठाणे येथील वि.प्र.मं.चे ठा.म.पा विधी महाविद्यालय ३५ विद्यार्थी आणि प्राध्यापक हेतल मिशेरी आणि श्रीमती कृष्णा कामथ यांनी मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागाद्वारे आयोजित 'भारतामधील न्यायप्रणालीचा गुन्हेगारी बाजूने आढावा' या विषयावर न्यायमूर्ती श्री. अभय ओक यांच्या विशेष व्याख्यानमालेत सहभाग घेतला. या कार्यक्रमात प्रमुख भाषण न्यायमूर्ती अभय श्रीनिवास ओक, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, यांनी त्यांच्या तज्ज्ञतेवर व शिक्षणावर आधारित दिले. भारतीय न्यायव्यवस्थेमध्ये न्यायमूर्ती अभय श्रीनिवास ओक हे एक उल्लेखनीय व्यक्तिमत्त्व मानले जातात, जे त्यांच्या सखोल कायदेशीर ज्ञान, न्यायासाठी असलेल्या निष्ठा, आणि कायद्याच्या अंमलबजावणीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांसाठी ओळखले जातात. त्यांनी सर्व विधी विद्यार्थ्यांनी एलएलबी पदवी मिळवल्यानंतर न्यायालयीन प्रॅक्टिस करावी, असे आवाहन केले. न्यायालयांच्या स्थितीवर चर्चा करताना त्यांनी नमूद केले की, न्यायालयांमध्ये लाखो प्रकरणे प्रलंबित आहेत, ज्यांचे त्वरित निवारण करणे आवश्यक आहे. त्यांनी अभिमानाने नमूद केले की, आपला देश सर्वांत न्यायसंगत गुन्हेगारी न्यायप्रणाली असलेला देश आहे, जो कोणत्याही प्रकारे भेदभाव करत नाही. त्यांनी निष्पक्ष सुनावणीचा दाखला म्हणून कसाबच्या प्रकरणाचे उदाहरण दिले.




सरांनी भारतातील गुन्हेगारी न्यायशास्त्र प्रणाली कशी कार्य करते याचे थोडक्यात स्पष्टीकरण दिले आणि आपल्या देशातील आरोपींना असलेल्या सर्व अधिकारांवर सविस्तर प्रकाश टाकला. सत्राच्या शेवटी, न्यायमूर्ती ओक यांनी विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तर सत्रात थोडक्यात संवाद साधला आणि तरुण विधी विद्यार्थ्यांच्या सर्व संबंधित प्रश्नांची उत्तरे दिली.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे भव्य ग्रंथ दिंडी चे आयोजन**

'वाचनसंकल्प-महाराष्ट्राचा' या अभिनव उपक्रमांतर्गत वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी

महाविद्यालयाच्या ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे भव्यग्रंथ –दिंडीचे आयोजन दिनांक १० जानेवारी २०२५ रोजी ठीक सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत केले होते. ग्रंथ – दिंडीची सर्व पूर्व तयारी ग्रंथालयात करण्यात आली. पालखीची संपूर्ण सजावट केली. ज्ञानेश्वरी, दासबोध, भारतीय संविधान, रामचरित मानस, पर्यावरण, आणि इतर विषयाचे ग्रंथ पालखीत ठेवण्यात आले होते. सजवलेली पालखी ग्रंथालयातून कॉलेज गेट वर आणण्यात आली. त्या प्रसंगी सर्वांच्या उपस्थितीत ग्रंथ–दिंडीचे पुष्पहार आणि श्रीफळ अर्पण करून पूजन करण्यात आले. याप्रसंगी मोठ्या संख्येने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी पारंपरिक वेशात हजर होते. मोठ्या उत्साही वातावरणात वाचनाचे महत्त्व आणि वाचन संस्कृती या संबंधी घोषणा दिल्या. सर्वजण पारंपरिक वेशात आले असल्याने वातावरण दिंडीमय झाल्याचे पाहायला मिळाले. महाविद्यालयाच्या माहिती – तंत्रज्ञान विभागाच्या स्टाफच्या लेझीम पथकाने दिंडी समोर लेझीम नृत्य सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. दरम्यान महिला वर्गाना फुगडीचा मोह आवरता आला नाही त्यांनीही फुगडीचा आनंद घेतला.

कॉलेज गेट पासून ग्रंथ–दिंडी ही कॉलेज कॅन्टीन समोरून बी. एन. बांदोडकर महाविद्यालयाला वळसा घालून थेट डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्थेसमोर आली. त्या ठिकाणी ग्रंथ–दिंडीच्या पालखीला विसावा दिला. दरम्यान विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर याच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. 'वाचाल तर वाचाल, वाचन करा, वाचन करा. हाच खरा ज्ञानाचा झरा, वाचन संस्कृती घरोघरी, तिथे फुले ज्ञानपंढरी' इत्यादी घोषणांनी परिसर दणाणून गेला. लेझीम पथकानेही त्या ठिकाणी लेझीमनृत्य सादर केले. त्यानंतर ज्ञान सरिता दिंडी आपल्या मूळ महाविद्यालयाकडे मार्गस्थ झाली. ती मूळ ठिकाणी कॉलेज गेट समोर आल्यानंतर सर्वांना पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. सदर ज्ञान सरिता ग्रंथ दिंडीच्या माध्यमातून वाचनाचे महत्त्व, संस्कृती जतन आणि भारतीय संविधानाप्रती असलेला आदरभाव हा सांगण्याचा मूळ उद्देश होता. सदर ग्रंथ दिंडी यशस्वी होण्यासाठी डॉ. गीताली इंगवले, श्री. चंद्रकांत शिंगाडे, सौ. प्रज्ञा दळवी, तेजस्विनी जोंधळे, ऐश्वर्या डोके, शिवानी चोपडे, प्रा. आनंद आचार्य आणि प्रदीप मुळे इत्यादींचे सहकार्य लाभले.









## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

२-३ डिसेंबर २०२४ : डॉ. नीतिन जोशी यांना MPCOE (वेळणेश्वर) येथे ; डॉ. पेजावर यांच्यासह राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद (NAAC) परिक्षण तालीम (प्री व्हिजिट मॉक) आयोजित करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

४ डिसेंबर २०२४ : डॉ. नीतिन जोशी यांना रिझवी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट वांद्रे येथे मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधी, तसेच विषय तज्ज्ञ म्हणून निमंत्रित करण्यात आले.

१२ डिसेंबर २०२४ : जोशी - बेडेकर कॉलेज, ठाणे व रोटरी क्लब ठाणे तर्फे आयोजित रोटरी युथ लीडरशिप अवॉर्ड या स्पर्धेमध्ये ब्रिम्सच्या एमएमएस २०२४-२६ तुकडीच्या १ल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांचे यश :-

आयुष सुनील घाडीगावकर याने रोटरी युवा नेतृत्व पुरस्कार स्पर्धे मध्ये मिस्टर RYLA (रनर अप १) द्वितीय क्रमांकाचे स्थान पटकावले.

तर हेमांगी म्हापसेकर आणि अवनीश महेंद्र प्रजापती यांनी मिस्टर RYLA (रनर अप २) स्थान जिंकले.

तसेच, दीपाली राठोड आणि सयुक्ता यादव या विद्यार्थिनी RYLA संघ सदस्य पुरस्कार जिंकल्या.






१४ डिसेंबर २०२४ : डॉ. नीतिन जोशी यांना ठाकूर ग्लोबल बिझनेस स्कूल येथे शिक्षकांच्या नियुक्तीसाठी तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

**२१ डिसेंबर २०२४ : फ्युचर फॉरवर्ड या स्टार्ट-अप समिटचे आयोजन** - डॉ. व्ही. एन. ब्रिम्स तर्फे पाणिनी सभागृहामध्ये फ्यूचर फॉरवर्ड या भव्य स्टार्ट-अप समिट चे आयोजन करण्यात आले.

व्यावसायिक ज्ञानाची देवाणघेवाण आणि व्यावसायिक बंध जोडणीसाठी (नेटवर्किंगसाठी) एक व्यासपीठ उपलब्ध करून देऊन नवोपक्रम आणि उद्योजकतेच्या वाढीस चालना देणे हे या संमेलनाचे उद्दिष्ट होते.

ब्रिम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी स्वागतपर भाषण केले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.विजय बेडेकर यांच्यासारखे दूरदर्शी मार्गदर्शक; आयआयएम मुंबई येथील सीएसआर उपक्रमांचे अध्यक्ष प्रा. शंकर मूर्ती; आणि ए आय सी टी इ (AICTE) च्या MoE इनोव्हेशन कक्षाचे इंडोव्हेशन मॅनेजर श्री. उमेश राठोड तसेच आयआयएम - मुंबईचे डीन डॉ. शिरीष सांगळे, यांनी उद्योजगतावाढीच्या दृष्टीने मार्गदर्शन करणारी उद्बोधक व्याख्याने सादर केली.

स्टार्ट-अप इकोसिस्टम, अनलॉकिंग एंटरप्रेन्युरिअल माइंडसेट आणि स्टार्ट-अप सक्सेससाठी ए आय (AI) हार्नेसिंग यांसारख्या प्रमुख विषयावर देखील श्री. देवरुत जाधव आणि श्री. यश संघवी यांसारख्या उद्योग तज्ज्ञांनी उपस्थितांना संबोधित केले.

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात पीच सेशन या कौन बनेगा आंत्रप्रेन्युअरशिप चॅम्पिअन स्पर्धा कार्यक्रमात व्हेंचर कॅपिटलिस्ट तज्ज्ञ असलेल्या परीक्षकांसमोर आपल्या नवोपक्रम कल्पनांचे प्रदर्शन आणि थेट प्रात्यक्षिके करणे आणि संभाव्य गुंतवणूकदारांना सादर करणे त्यांचे मार्गदर्शन मिळवणे भविष्यातील सहयोगासाठी प्रयत्न करणे या सारख्या उपक्रमांचा समावेश होता.

ब्रिम्सच्या नवसंकल्पना (आय आय सी) कक्षाच्या उपाध्यक्ष डॉ. विभूती सावे यांनी या संमेलनाचे समन्वयन केले आणि संमेलनाचे संयोजक डॉ. पंकज नांदुरकर यांच्या आभार प्रदर्शनाने परिषदेची सांगता झाली.







२१ डिसेंबर २०२४ : : लाला लजपतराय कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स तर्फे आयोजित 'इनोव्हेटिव्ह होरायझन्स : ए मल्टिडिसिप्लिनरी अप्रोच फॉर हार्नेसिंग नॉलेज फॉर ए फॉरवर्ड थिंकिंग फ्युचर' या राष्ट्रीय परिषदे मधील सादरीकरण स्पर्धेतील; ट्रॅक १ गटात; सहा. प्रा. कृष्णकांत लसुणे यांनी प्रथम पारितोषिक जिंकले. तर ट्रॅक २ गटात ; सहा. प्रा. अदिती दामले – पवार आणि सहा. प्रा. प्रथमेश यू तावडे यांनी प्रथम पारितोषिक जिंकले.

२२ डिसेंबर २०२४ : डॉ. स्मिता जपे आणि डॉ. कांचन अक्षय यांना ट्रान्सफॉर्मिंग द मेन्स्ट्रुअल हेल्थ इन रूरल इंडिया : ए केस स्टडी ऑफ प्रोजेक्ट सखी – एज्युकेशनल इम्पॅक्ट या शीर्षकाच्या केस स्टडी सादरीकरणासाठी प्रमाणपत्र मिळाले. हे सादरीकरण प्रतिष्ठित अशा आयआयएम नागपूर येथे आयोजित आयव्हीईवाय केस कॉन्फरन्स २०२४ मध्ये सादर करण्यात आले.







तसेच डॉ. पल्लवी चंदवासकर यांची केस स्टडी देखील या आयआयएम नागपूर आय व्ही ई वाय केस कॉन्फरन्स, शेपिंग द फ्युचर: बिझनेस मॅनेजमेंट ट्रेंड्स अँड इनसाइट्स फॉर टुमारो मध्ये सादरीकरणासाठी निवडली गेली आणि त्यांनी २२ डिसेंबर २०२५ रोजी दूरस्थ (ऑनलाइन) माध्यमाद्वारे तिचे सादरीकरण केले.




•••

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❈ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❈ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❈ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.